मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १२१ ■ गुरुवार, ०८ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# दर्पण रत्न पुरस्कार 2026 निमित्ताने आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीला उजाळा

## हिंदी मराठी पत्रकार संघाकडून मलकापूर येथे लेखणीच्या योद्धयांचा यथोचित सन्मान

**दैनिक युवक आधार**

**संपादक संतोष आमले :** पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून ६ जानेवारी २०२६ रोजी मलकापूर येथे" राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्कार 2026" हा भव्य सोहळा अत्यंत दिमाखात संपन्न झाला. हिंदी मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात पत्रकारिता क्षेत्रात अहोरात्र झटणाऱ्या निधड्या छातीच्या पत्रकारांना सन्मानित करण्यात आले. मलकापूर येथे मराठा मंगल सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला .आंतरराष्ट्रीय मानांकन आयएसओ 9001_2015 प्रमाणित हिंदी मराठी पत्रकार संघ च्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी दर्पण रत्न पुरस्कार 2026 चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रस्ताव ऑनलाइन मागवण्यात आले होते

त्यावेळी 980 प्रस्तावांपैकी निवड करून 240 मान्यवरांना दर्पण रत्न पुरस्कार 2026 प्रदान करण्यात आला. दर्पण रत्न पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलेश तायडे सहा. माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई कार्यक्रमाचे उद्घाटक

डॉ. प्रा. अनिल खर्चे (प्राचार्य व्ही. बी. कोलते इंजीनियरिंग कॉलेज) , तर प्रमुख पाहुणे अशांत भाई वानखेडे संस्थापक समतेचे निळे वादळ , धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, बंडूभाऊ चवरे उद्योजक, बाळासाहेब दामोदर उद्योजक , दामोदर शर्मा शेतकरी नेते, विजय डागा, बंडू चौधरी, सुभेदार दिनेश तायडे कारगिल योद्धा, चंद्रकांत वर्मा, हे होते. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक ,राजकीय ,कला, वैद्यकीय, उद्योजक, क्रीडा अशा अनेक क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा सत्कार दर्पण रत्न



पुरस्कार 2026 देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी देशासाठी आपल्या प्राणाची परवा न करता देशसेवा करणाऱ्या तसेच कारगिल युद्धात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सुभेदार दिनेश तायडे माजी सैनिकांचा स्मृतिचिन्ह यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पत्रकारांना मार्गदर्शन करताना धनश्री ताई काटीकर पाटील यांनी पत्रकारितेचे समाजातील स्थान अधोरेखित केले पत्रकार लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ आहे संकटाच्या काळातही आपली लेखणी जिवंत ठेवून समाजाला न्याय देण्याचे काम पत्रकार करतात असे शब्दांत त्यांनी पत्रकारांचे कौतुक केले . त्यांचे शुभहस्ते पत्रकरिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारा पत्रकारांना सन्मानित करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील अन्यायाला वाचा फोडणाऱ्या आणि जनहित जपणाऱ्या पत्रकारांना यावेळी गौरविण्यात आले.समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या निष्ठेचा आणि परिश्रमाचाही यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या

**राज्यभरातून आलेल्या ज्येष्ठ पत्रकारांना पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार**

**आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग पत्रकारितेला अर्पण करणाऱ्या तो गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारितेत त असलेल्या जेष्ठ पत्रकारांना याप्रसंगी पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले यावेळी श्री दयानंद मांगले सिंधुदुर्ग, नामदेव पाडवी नाशिक, युवराज बच्छे ४० गाव , मोहन कदम मालाड , शरद मोरे रत्नागिरी, संतोष सातकर पुणे , नेमीनाथ जैन परभणी, मुकुंद निघोजकर अहिल्यानगर, चंद्रकांत हगलगुंडे तुळजापूर यांना पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला**

शेवटी उपस्थितांचे आभार मानताना एक वेगळीच ऊर्जा पाहायला मिळाली . पत्रकार हे समाजाचा कणा आहे, आणि त्याच्या सन्मानाने लोकशाहीचे मूल्य अधिक घट्ट होतात अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. मलकापूर परिसरातील या सोहळ्याने केवळ पत्रकारांचा गौरवच नाही तर बदलत्या काळातही लेखणीची ताकद शाबूत असल्याचा संदेश संपूर्ण हिंदी मराठी पत्रकार संघाने दिला . अत्यंत शिस्त , प्रेरणादायी वातावरणात पार पडलेला सोहळा उपस्थित पत्रकारांसाठी एक अविस्मरणीय ठेवा ठरला.

लेखणीचा सन्मान हाच आमचा स्वाभिमान हा संदेश देत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या विचारांची मशाल तेवत ठेवत प्रेरणादायी कार्यक्रमाची सांगता झाली . एक सुंदर आणि शिस्तबद्ध आयोजन म्हणून या कार्यक्रमाची चर्चा संपूर्ण परिसरात रंगली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अजय टप, सतीश दांडगे, प्रा. प्रकाश थाटे, सुधाकर तायडे, प्रमोद हिवराळे,नथूजी हीवराळे , मयूर लड्डा, शेख ताहेर , विनायक तळेकर, भाऊराव व्यवहारे , सुनील देशमुख, अमोल वानखेडे, किशोर सोनवणे, विनोद व्यवहारे, श्रीकृष्ण शिरसागर, बिस्मिल्ला पठाण, आत्माराम मोरे,यांनी परिश्रम घेतले

## बारामती आरटीओचा रस्ता सुरक्षा अभियान; महिलांची दुचाकी प्रबोधन रॅली

**दैनिक युवक आधार**

**बारामती, प्रतिनिधी :**

बारामती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यामध्ये वाहनचालकांमध्ये जनजागृती केली जात आहे. महिलांची प्रबोधनात्मक रॅलीही काढण्यात आली.माळेगाव बुद्रुक येथील शरद सभागृहामध्ये उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व शिवनगर विद्या प्रसारक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने अभियानाचा शुभारंभ



झाला. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे सचिव धनंजय ठोंबरे, प्राचार्य संदीप शहा आदींची प्रमुख उपस्थिती होती.या वेळी माळेगाव नगरपंचायत वेशीपासून शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचा कॅम्पस अशी महिलांची दुचाकी रॅली काढण्यात आली. रस्ता सुरक्षाविषयी पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये शिवनगरच्या डिप्लोमा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. वाहतुकीचे नियम पाळणे, हेल्मेट परिधान करणे, सीट बेल्ट लावणे, मद्यपान न करता वाहन चालविणे, अपघात घडल्यानंतर गोल्डन अवर्समध्ये जखमीला उपचारासाठी दाखल करणे आदी मुद्दे पथनाट्याच्या माध्यमातून मांडण्यात आले. रस्ता सुरक्षा विषयक मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## विद्यार्थिनींकडून जबरदस्तीने नमाज पठण; अज्ञात युवतीविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**वाडा प्रतिनिधी :** वाडा तालुक्यातील पोशेरी गावात असणाऱ्या आयडियल कॉलेजच्या वसतिगृहात एका विद्यार्थिनीला जबरदस्तीने नमाज पठन करण्यास भाग पाडल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. वाडा पोलीस ठाण्यात अज्ञात विद्यार्थिनी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून वाडा पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधिक्षक यतीश देशमुख, स्थानिक पोलीस व पालघर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. दरम्यान या प्रकाराने परिसरात काही



काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

नाशिक जिल्ह्यातील एक विद्यार्थिनी १ जानेवारीपासून आयडियल फाऊंडेशन कॉलेजमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील फिजिओथेरपी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे. कॉलेजच्या वसतिगृहात इतर तीन विद्यार्थिनींसोबत ती राहत असून ४ जानेवारीला रात्री सुमारे ११ ते १२ वाजण्याच्या सुमारास वसतिगृहात वॉटर फिल्टर मधील पाणी आणण्यासाठी सहाव्या मजल्यावर गेली होती. पाणी घेऊन येत असताना पायरी जवळच चेहऱ्याला सफेद कपडा बांधलेली एक अज्ञात युवतीने विद्यार्थिनीला अडवून हमारे जैसा नमाज करो असे सांगितले. पीडित विद्यार्थिनीने मला नमाज येत नसल्याचे सांगितले मात्र अज्ञात युवतीने तुला नमाज पठण करावा लागेल असे सांगत जोर जबरदस्तीने,

दबाव टाकत नमाज पठण करण्यास भाग पाडले. कॉलेजमध्ये नवीन असल्याने व घटनास्थळी एकटीच असल्याने नाईलाजाने या विद्यार्थिनीने नमाज पठण केला.

घडलेल्या प्रकाराने पीडित विद्यार्थिनी प्रचंड मानसिक दबावाखाली आली असून नातेवाईकांना कळवून या घटने विरोधात वाडा पोलीसात फिर्याद नोंदविण्यात आली. वैद्यकीय महाविद्यालयात घडलेल्या या प्रकाराने खळबळ माजली असून याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

सामाजिक व धार्मिक सलोखा बिघडू नये यासाठी पालघरचे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

प्राथमिक चौकशीत हा प्रकार रॅगिंगशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाल्याने संबंधितांविरोधात गुन्हा दाखल आला असून अधिक तपास सुरू आहे.

## राज्यात पुणेकरांची अवयवदानात बाजी; मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगरलाही टाकले मागे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** पुणे शहराने २०२५ या वर्षात मरणोत्तर अवयवदानात संपूर्ण महाराष्ट्रात अग्रस्थान प्राप्त केले आहे. पुण्यातील झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन सेंटरने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरात राज्यात एकूण १५३ जणांचे मरणोत्तर अवयवदान झाले, त्यात पुण्यात ७९ मृतांच्या अवयवदानाचा यशस्वी समन्वय साधण्यात आला. या दातृत्वामुळे तब्बल २०७ गंभीर रुग्णांना नवीन आयुष्य मिळाले आहे. पुणे विभागाने आघाडी घेत मुंबई, नागपूर, छात्रपती संभाजीनगरलाही मागे टाकले आहे.

राज्यात मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या चार विभागीय प्रत्यारोपण समन्वय समित्या कार्यान्वित आहेत. गेल्या वर्षी पुणे



विभागात सर्वाधिक ७९ जणांचे तर मुंबई विभाग ५३, नागपूर विभाग १६ आणि छत्रपती संभाजीनगर विभाग ५ असे मरणोत्तर अवयवदान झाले. पुणे विभागात पुण्यासह, कोल्हापूर, सांगली, सातारा, अहिल्यानगर, सोलापूर, नाशिक, धुळे आणि जळगाव या जिल्ह्यांचा समावेश आहे. पुण्यात झालेल्या २०७ प्रत्यारोपणामध्ये ११७ मूत्रपिंड, ६७ यकृत, १३ फुफ्फुसे आणि ४ हृदयांचा समावेश आहे.

मेंदूमृत्यूची (ब्रेनडेड) कारणे पाहता २८ दात्यांचा मृत्यू अपघात किंवा इजा (ट्रॉमा) यामुळे झाला असून, ५१ दाते आजारपण किंवा इतर नॉन-ट्रॉमा कारणांमुळे मेंदूमृत झाले. एकूण अवयवदात्यांपैकी ७२ टक्के पुरुष (५७ दाते), तर २८ टक्के महिला (२२ दाते) आहेत. महिला दात्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे नागरिकत्व असलेल्या महिलेचा समावेश आहे. पुणे विभागातील मेंदूमृत अवयव दात्यांमध्ये अपघातातांमुळे मृत्यू झालेले २८ दाते असून, ५१ दाते आजारपणासह इतर कारणांमुळे मृत्यू झालेले आहेत, अशी माहिती पुणे विभागीय अवयव प्रत्यारोपण समितीच्या समन्वयक आरती गोखले यांनी दिली.

या प्रत्यारोपणांमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपणांची संख्या सर्वाधिक असून, त्यामुळे ११७ जणांना जीवनदान मिळाले आहे. त्या खालोखाल ६७ यकृत प्रत्यारोपण, १३ फुफ्फुस प्रत्यारोपण आणि चार हृदय प्रत्यारोपण करण्यात आले, तसेच हृदय आणि फुफ्फुस एकत्रित प्रत्यारोपण एक, मूत्रपिंड आणि हृदय प्रत्यारोपण एक, तसेच मूत्रपिंड आणि स्वादुपिंड यांचे एक प्रत्यारोपण झाले आहे. राज्यासह देशातही अवयवदानाबाबत जनजागृती वाढत असून त्यामुळे अनेक गंभीर रुग्णांना नवसंजीवनी मिळत आहे. देशातील मरणोत्तर अवयवदानांमध्ये महाराष्ट्राने चौथे स्थान प्राप्त केले आहे.

सर्वाधिक मरणोत्तर अवयवदान तमिळनाडूमध्ये (२६७) झाले असून त्याखालोखाल तेलंगणा (२०५) आणि कर्नाटकने (१९८) स्थान प्राप्त केले आहे. महाराष्ट्र १५३ मरणोत्तर अवयवदानासह चौथ्या स्थानी असून गुजरातने (१५२) पाचवा क्रमांक पटकावला आहे.

## कशेडी घाटात पेप्सी वाहतूक करणारा कंटेनर पलटी; एक लेन पूर्ण बंद!

**दैनिक युवक आधार**

**रायगड, प्रतिनिधी :** मुंबई–गोवा महामार्गावरील कशेडी घाटात मुंबई दिशेने जाणारा पेप्सी वाहतूक करणारा कंटेनर पलटी झाल्याने एक लेन पूर्णपणे बंद झाली आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. हा अपघात बुधवारी सकाळी घडला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, कंटेनर चालक राम आचल मिंद (रा. उत्तर प्रदेश) हा आपल्या ताब्यातील कंटेनर क्रमांक एमएच ४३ जीई २२४४ घेऊन लोटे ते भिवंडी-वाडा असा प्रवास करत होता.

कशेडी घाटात पोलादपूरजवळ चोळई गावच्या हद्दीत आल्यानंतर चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने कंटेनर पलटी झाला.

या अपघातात कंटेनरमधील पेप्सीच्या बाटल्या महामार्गावर सर्वत्र अस्ताव्यस्त पसरल्या असून कंटेनर रस्त्यावर आडवा झाल्याने एक लेन पूर्णपणे बंद झाली आहे.

या घटनेची माहिती पोलादपूर पोलिसांना



मिळताच पोलीस उपनिरीक्षक मंगेश मुंढे यांनी पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. तसेच कशेडी महामार्ग पोलिसही घटनास्थळी दाखल झाले.

महामार्गावरील वाहतूक पोलादपूर–खेड दिशेने जाणाऱ्या एकाच लेनवर वळवून सुरू ठेवण्यात आली आहे. त्यामुळे महामार्गावर वाहतुकीचा मोठा अडथळा निर्माण झाला नाही.

सदर अपघातग्रस्त कंटेनरमधील महामार्गावर पडलेल्या पेप्सीच्या बाटल्या बाजूला करण्याचे तसेच क्रेनच्या सहाय्याने कंटेनर बाजूला करण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# उपमहापौर पदाचा अनुभवाचा फायदा सिताताई पाटील यांना होणार

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी** : खांदा कॉलनी प्रभाग 15 मधून भाजपच्या चौथ्यांदा निवडणूक लढविणाऱ्या सिताताई पाटील यांना पालिका प्रशासनाच्या अनुभवाचा फायदा होणार असल्याचे दिसते पनवेल महापालिकेचे उपमहापौर असताना देखील भाजीपालाचा आपला व्यवसाय सांभाळून त्या दररोज नागरिकांच्या संपर्कात राहत नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी दररोज उपलब्ध राहत असल्याचे पहावयास मिळत आहे खांदा कॉलनीतील फेरीवाल्यानसाठी हॉकरस झोन असावा या मागणीसाठी त्यानी सातत्याने आंदोलन केले या मागणीला यश येऊन आता लवकरच हॉकरस झोन होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट




केले आहे खांदा कॉलनीतल पाण्याच्या रस्त्याच्या मागणी साठी सिडकोवर वांरवार त्यांनी आंदोलन मोर्चा काढले वांरवार लोंकाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्या पनवेल प्रशासना बरोबर आक्रमक राहीले असल्याने या कामाचा फायदा होणार असल्याचे पहावयास मिळत आहे शिवाय उपमहापौर असताना प्रशासनावर वचक बसवून खांदा कॉलनीतील अनेक कामे त्यांनी करून घेतली आहेत या कामाचा अनुभवाचा फायदा त्यांना होणार असल्याचे दिसते आहे

# कडुस येथील ब्लू बेल फार्म येथे GSP- गर्ल्स स्कॉलरशिप प्रकल्पाच्या मुलींसाठी एक दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर** : गर्ल्स स्कॉलरशिप हा प्रकल्प फोर्ब्ज मार्शल, कोर्निंग , ARaymond व टाटा ऑटोकॉम, या समविचारी कंपन्याच्या आर्थिक सहकार्याने व योजक व आय टिच स्कूल यांच्या संयुक्त विद्यमानने खेड तालुक्यातील (जि. पुणे) एकुण 31 (ऐक्तिस ) माध्यमीक शाळांमधील आर्थिक परिस्थिती नाजुक असलेल्या व इयत्ता 8 वी ते 12 वी मध्ये शिकत असलेल्या मुलींसाठी हा प्रकल्प राबवला जातो. सध्या या प्रकल्पाच्या माध्यमातून एकुण 1512 मुलीना स्कॉलरशिपची मदत व इतर सेशनच्या माध्यमातून वेगवेळया विषयांचे मार्गदर्शन, इ 10 वी व 12 वी नंतरच्या शैक्षणिक वाटा, व्यवसायिक अभ्यासक्रम, याचे मार्गदर्शन केले जाते.

हे शिबिर 25 ते 26 डिसेंबर, 27 ते 28 डिसेंबर 2025 व 1 ते 2 जानेवारी 2026 असे एकुण 3 टप्प्यामध्ये ब्लू बेल फार्म कडुस, ता खेड जि. पुणे या ठिकाणी घेण्यात आले.या शिबिरामध्ये इयत्ता 10 वी व 12 वी मध्ये शिकत असलेल्या एकुण 350 मुली सहभागी झाल्या होत्या. या शिबिराचा मुख्य उद्देश म्हणजे प्रकल्पाच्या माध्यमातून ज्या शाळाबरोबर काम चालू आहे अशा मुलीना एकत्र आणणे व त्यांची एकमेकंबरोबर ओळखा व्हावी , त्यांना गाणी, गप्पा, गोष्टी व खेळाचा आनंद घेता यावा तसेच वेगवेगळया संस्थाचे शैक्षणिक व व्यवसायिक प्रशिक्षणाची माहिती एकाच ठिकाणी मिळावी हा होता. या शिबिराची सुरुवात ड्रीम, डिसकव्हर, व डू या थीमने करण्यात आली.




तसेच यामध्ये 10 वी किवा 12 वी च्या परीक्षेला कशा पध्दतीने समोरे जावे, गणित , विज्ञान, इंग्रजी, व इतर भाषा विषयाच्या परीक्षेची तयारी कशी करावी , जास्तीत जास्त मार्क कसे मिळतील व मनाची स्थिरता कशी असावी या गोष्टी वेगवेळया ऐक्टिविटीच्या माध्यमातून संध्या गवळी, विभुते सर (योजक प्रतिनिधी) यानी हे सत्र घेतली . याच बरोबर 10 वी व 12 वी

पूर्ण झाल्यावर ध्येय निश्चिती कशी करावी. पुढील शैक्षणिक वाटा कश्या आहेत. करिअर संधी कोणत्या आहेत. तसेच लाइफ स्किल बाबत पण सेशन /सत्र घेण्यात आले. हे शिबिर मधे समावेश फाउंडेशनचे प्रतीनिधी तसेच आयटीच स्कूल फाउंडेशन (C2C college to career) चे प्रतिनिधी. यांनी दहावी बारावीनंतर करिअरची संधी मार्गदर्शन व अँक्टिव्हिटी घेतले.

वरील शिबिर यशस्वी करण्यासाठी बिना जोशी-(फोर्ब्स मार्शल समाज विकास प्रमुख) स्वप्निल हुंबरे (फोर्ब्स मार्शल समाज कल्याण प्रमुख/GSP program समन्वयक, अॅड धम्मपाल कांबळे( समन्वयक आयटीच स्कूल फाऊंडेशन ) मनिषा कड-GSP समन्वयक, व प्रतिनिधी प्रतीक्षा मेदगे, सारिका ओहळ,विद्या सावंत, अनिशा पापळ, चांदणी वाघचोरे, विजया कदम, उषा कोळेकर,निकिता पावाडे, आयशा मुंडे,अर्चना रणपिसे, आयटीच प्रतिनिधी शंकर जाधव, प्रियंका नाईकडे, पूजा गुंजाळ आदी उपस्थित होते.

# पत्रकार दिनी दत्ता खंदारे विशेष पुरस्काराने सन्मानित!

**दैनिक युवक आधार**
**मुबंई (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघांचे २५वे वर्ष आणि पत्रकार दिनाचे औचित्य साधून साप्ताहिक भगवे वादळचे संपादक आणि पत्रकार दत्ता खंदारे यांना विशेष पुरस्कार देऊन मान्यवर व्यक्ती च्या हस्ते सन्मानित करण्यात आले.यावेळी मंचावर मुंबईचे लाडके व्यक्तिमत्व माजी नगरपाल (मुंबईचे शेरीफ) जगन्नाथराव हेगडे,जेष्ठ संपादक डॉ सुकृत खांडेकर,जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि कवयित्री सौ.जयश्री ताई संगितराव,संघाचे प्रमुख कार्यवाहक अशोक भोसले आणि संघाचे अध्यक्ष प्रकाश पाटकर उपस्थित होते.

पत्रकार दत्ता खंदारे यांनी गेल्या २९वर्षाच्या कालावधीत विविध दैनिक, साप्ताहिक आणि




मासिकांमध्ये सामाजिक समस्या मांडून त्या सोडविण्यासाठी अथक प्रयत्न केले. तसेच प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची कात्रणे संबंधित खात्याकडे पाठवून समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा केला. पत्रकार दत्ता खंदारे यांना आजपर्यंत पन्नासहून अधिक पुरस्कार मिळाले असून पत्रकार दिनी त्यांना सन्मानित केल्या बद्दल महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघांचे आभार व्यक्त केले.

# रुग्णालयातील पेशंटच्या ताटातील भात वादाच्या भोवऱ्यात; तांदूळ लेखापरीक्षण अहवालाकडे सर्व प्रशासनाचे लक्ष

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे :** राज्यातील विविध रुग्णालयात पेशंटसाठी जी अन्नाची सोय केली जाते त्यामध्ये भात हा मुख्य घटक असतो. या भातासाठी लागणारा तांदूळ खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली जाते. मात्र या तांदूळ पुरवठा योजनांच्या निविदा प्रक्रियेत वाद निर्माण झाला असून लेखापरीक्षण अहवाल आता कोणाला अडकवणार यावर प्रशासनाचे लक्ष लागले आहे.

निविदा प्रक्रिया, अटी-शर्ती, दरनिश्चिती व पुरवठा व्यवस्थापन या बाबी जिल्ह्यानुसार वेगवेगळ्या पद्धतीने राबविल्या जात असल्याने एकसमानता व स्पष्टतेचा मुद्दा उपस्थित होत आहे. नियमानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना निविदा प्रक्रियेचे अधिकार असले, तरी निविदा कागदपत्रांतील तांत्रिक बाबी, पात्रतेचे निकष आणि कालमर्यादा याबाबत काही जिल्ह्यांमध्ये अधिक स्पष्टीकरणाची गरज असल्याचे चित्र आहे. परिणामी प्रक्रिया समजून घेण्यासाठी अतिरिक्त वेळ लागत असल्याचे निरीक्षण नोंदवले जात आहे.

तांदूळ हा सार्वजनिक वितरण व कल्याणकारी योजनांसाठी अत्यावश्यक घटक असल्याने, गुणवत्तेपासून ते वितरणापर्यंत प्रत्येक टप्प्यावर नियोजनबद्ध अंमलबजावणी अपेक्षित आहे. मात्र जिल्हानिहाय अंमलबजावणीत असलेल्या फरकामुळे



पुरवठा प्रक्रियेबाबत विविध प्रश्न लेखापरीक्षण अहवालात उपस्थित केले आहेत.प्रशासनिक सूत्रांकडून सर्व प्रक्रिया शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसारच राबवण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात येत आहे. मात्र निविदा प्रक्रिया अधिक सुस्पष्ट, पारदर्शक व सर्व संबंधितांना सहज समजेल अशा स्वरूपात मांडल्यास अंमलबजावणीत सुसूत्रता येईल, असे मत लेखापरीक्षण अहवाल सांगत आहे.

तांदूळ पुरवठ्यासारख्या मूलभूत बाबतीत जिल्हा स्तरावर एकसमान कार्यपद्धती ठरवण्याची गरज असून, यामुळे प्रशासन व नागरिकांमधील समन्वय अधिक प्रभावी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुंबईतील पालिकेचे सायन रुग्णालय तांदूळ खरेदी प्रकरणात वादाच्या भोवऱ्यात सापडले असल्याने राज्यातील रुग्णालयांच्या अन्न खरेदी प्रकरणात मनमानी कारभार सुधारावा अशी मागणी पेशंट करत आहेत.

# पेणच्या नगराध्यक्षपदी प्रितम पाटील विराजमान; उपनगराध्यक्ष पद कोणाच्या गळ्यात पडणार चर्चेला उधाण

**दैनिक युवक आधार**
**पेण दीपक लोके :** पेणच्या जनतेने दाखविलेल्या विश्वासामुळे मी आज तिसऱ्यांदा पेणच्या नगराध्यपदी विराजमान होत असून आता जबाबादारी वाढली असून हि जबाबदारी पार पाडत असताना येणाऱ्या काळात माझा प्रत्येक निर्णय जनतेच्या विकासासाठी व पेणच्या हिताचा घेतला जाणार असल्याचा शब्द या निमित्त देत असल्याचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी पदभार स्वीकारताना सांगितले. आज पेणच्या नगराध्यक्षपदाची सूत्रे नगराध्यक्ष प्रीतम पाटील यांनी स्वीकारली या सोहोळ्यास आमदार रविशेठ पाटील, माजी जि. प. सदस्य कौसल्याताई




पाटील,मा. आमदार अनिकेत तटकरे, माजी जि.प.सदस्य चित्रलेखा पाटील, गटनेते अनिरुद्ध पाटील, शिवसेना नेते रशाद मुजावर, पाटणेश्वर बँक अध्यक्षा प्रतिभा पाटील, उदयोजक राजू पिचिका, भाजप तालुकाध्यक्ष संजय डंगर, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष दयानंद भगत, शहराध्यक्ष जितेंद्र ठाकूर आदींसह नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते. यावेळी मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी नगराध्यक्षपदाचा पदभार प्रितम पाटील यांनी स्वीकारल्याचे जाहीर करीत त्यांचे अभिनंदन केले. यावेळी नूतन नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी पुढे बोलताना सांगितले कि, नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देणार असून यामध्ये रस्ते, पाणी, वीज या सुविधांचा समावेश असणार आहे. पेणच्या विकासासाठी नगरपरिषदेसाठी विकास निधी आणण्याचे काम आमदार रविशेठ पाटील, खासदार सुनिल तटकरे, खासदार धैर्यशिल पाटील यांच्या माध्यमातून आणण्याचे काम आगामी काळात होणार आहे. यावेळी आमदार रविशेठ पाटील यांनी पेणच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणण्याचे काम होणार असून मुख्य पाणीपुरवठ्याचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे काम होणार असून यासाठी निधी मंजूर करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मंडळींनी नूतन नगराध्यक्ष व नगरसेवकांना शुभेच्छा दिल्या.

# पनवेल महानगरपालिका प्रभाग १७ अ चे उमेदवार शंकर वायदंडे यांचे पारडे जड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रभाग 17 प्रतिष्ठेची ठरली असून प्रभाग 17 (अ) साठी आतापर्यंत स्थानिक प्रभागात राहणारा नगरसेवक मिळाला नव्हता आता पत्रकार शंकर वायदंडे जयाप्रभागाचे जाणते सामाजिक कार्यकर्ते असून प्रभाग सत्राच्या विकासासाठी त्यांनी आपल्या पत्रकार ते व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून वेळोवेळी काम केले आहे. प्रभाग 17 मधील सर्व जनतेच्या परिचित असलेले शंकर वायदंडे वंचित बहुजन आघाडी या पक्षाचे अधिकृत उमेदवार असून गॅस सिलेंडर या चिन्हावर ती लढत असल्याने नागरिकांकडून त्यांना मोठा पाठिंबा मिळत आहे त्याचबरोबर या प्रभागातील झोपडपट्ट्यांच्या विकासासाठी लढणारा एकमेव आश्वासक चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते आवाजवी मळमत्ता कर, पावसाळ्यात पाण्याने नवीन पनवेल ला पूरस्थिती निर्माण होणे, निकृष्ट दर्जाचे रस्ते, पालिकेला गोरगरिबांसाठी हॉस्पिटल नसल्याने सर्व जनता नाराज असून यावेळी जनतेत राहणारे प्रभागातील स्थानिक राहणार हक्काचा माणूस म्हणून शंकर वायदंडे यांच्या नावाची जोरदार चर्चा झाली असून शंकर वायदंडे घोडेबाजारात कधी विकणारा माणूस नसल्याने



अर्धी लढाई ते आधीच जिंकले असून गरीब जरी असले तरी स्वाभिमानी असल्याने शंकर वायदंडे यांना प्रभाग १७ अ मधून विजयी निच्छित होणार हे मात्र खरे..

त्यांच्यासमोर भाजपचे प्रकाश बिनेदार यांच्यासारख्या धनाड्याचे आव्हान असले तरी जनता मात्र यावेळी पैशाला विकली जाणार नसल्याने जनतेच्या हक्कासाठी सदैव प्रयत्न करणारा पत्रकार शंकर वायदंडे यांच्या पाठीशी उभे राहणार असून कधीही जनतेत न फिरल्याने व प्रभागात कोणतेच काम न केल्याने मोठी नाराजी माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांना याचा मोठा फटका बसणार आहे असे दिसून येते मात्र मतदार राजा हा यावेळी विकला जाणार नाही नवीन पनवेलचे मतदार सुज्ञ असून ते यावेळी जनतेचा आवाज उठवणारे प्रभागातील प्रश्नांची जाण असणारे शंकर मारुती वायदंडे यांना नक्कीच निवडून देतील असा जनतेतून विश्वास दिला जात आहे

# मराठी पत्रकार दिनानिमित्त डॉ.सुनील जीवनतारे यांना दर्पणरत्न पुरस्कार देऊन सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे :** बुलढाणा (मलकापूर)मराठी पत्रकार दिनानिमित्त हिंदी मराठी पत्रकार संघा च्या वतीने आयोजित *दर्पण रत्न पुरस्कार 2026* कार्यक्रम मलकापूर येथील मराठा मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला .आंतरराष्ट्रीय मानांकन आयएसओ 9001_2015 प्रमाणित हिंदी मराठी पत्रकार संघ च्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी दर्पण रत्न पुरस्कार 2026 चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रस्ताव ऑनलाइन मागवण्यात आले होते.

त्यावेळी 980 प्रस्तावांपैकी निवड करून 240 मान्यवरांना दर्पण रत्न




पुरस्कार 2026 प्रदान करण्यात आला. दर्पण रत्न पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलेश तायडे सहा. माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई कार्यक्रमाचे उद्घाटक

डॉ. प्रा. अनिल खर्चे (प्राचार्य व्ही. बी. कोलते इंजीनियरिंग कॉलेज) , तर प्रमुख पाहुणे अशांत भाई वानखेडे संस्थापक समतेचे निळे वादळ , धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, बंडूभाऊ चवरे उद्योजक, बाळासाहेब दामोदर उद्योजक , दामोदर शर्मा शेतकरी नेते, विजय डागा, बंडू चौधरी, सुभेदार दिनेश तायडे कारगिल योद्धा, चंद्रकांत वर्मा, हे होतेकार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक ,राजकीय ,कला, वैद्यकीय, उद्योजक, क्रीडा अशा अनेक क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा सत्कार दर्पण रत्न पुरस्कार 2026 देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी देशासाठी आपल्या प्राणाची परवा न करता देशसेवा करणाऱ्या तसेच कारगिल युद्धात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सुभेदार दिनेश तायडे माजी सैनिकांचा स्मृतिचिन्ह यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अजय टप, सतीश दांडगे, प्रा. प्रकाश थाटे, सुधाकर तायडे, प्रमोद हिवराळे, मयूर लड्डा, , शेख ताहेर , विनायक तळेकर, भाऊराव व्यवहारे , सुनील देशमुख, अमोल वानखेडे, किशोर सोनवणे, विनोद व्यवहारे, श्रीकृष्ण शिरसागर, बिस्मिल्ला पठाण,यांनी परिश्रम घेतले. डॉ. सुनील जीवनतारे माजी सभापती तथा माजी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती पवनी सामाजिक राजकीय चळवळीत सक्रिय योगदान देऊन वंचित घटकांसाठी अविरत कार्य करीत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय दर्पणरत्न पुरस्कार मलकापूर येथील भव्य कार्यक्रमात दिनेश कुमार तायडे कारगिल युद्धातील सुभेदार मेजर यांच्या हस्ते तसेच निर्देश सहायक माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई यांच्या प्रमुख उपस्थितीत देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरता अजय टप, सतीश दांडगे, प्रा. प्रकाश थाटे ,सुधाकर तायडे, मयूर लड्डा,प्रमोद हिवराळे ,शेख ताहेर ,विनायक तळेकर ,भाऊराव व्यवहारे ,सुनील देशमुख ,अमोल वानखेडे, किशोर सोनवणे ,विनोद व्यवहारे ,श्रीकृष्ण क्षिरसागर बिस्मिल्ला पठाण ,यांनी सहकार्य केले.

# महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन सप्ताहानिमित्त अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीत विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी/ बाळासाहेब रकटाटे :** महाराष्ट्र पोलीस दलाच्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक ०७/०१/२०२६ रोजी प्रभारी अधिकारी श्री. मंगेश साळवे यांच्या उपस्थितीमध्ये अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीत महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

या सप्ताहाच्या अनुषंगाने पोलीस–जनता नाते अधिक दृढ करणे, नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच गुन्हे प्रतिबंधासाठी समाजाचा सक्रिय सहभाग वाढविणे, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



या अंतर्गत सायबर गुन्हे व ऑनलाईन फसवणूक प्रतिबंध जनजागृती, वाहतूक व रस्ता सुरक्षा मार्गदर्शन, महिला व बालसुरक्षा विषयक जनजागृती, व्यसनमुक्तीबाबत युवक मार्गदर्शन, 'हर घर CCTV' संकल्पना, तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.सदर उपक्रमांद्वारे "भयमुक्त समाज – सुरक्षित नागरिक" हा संदेश देण्यात येत असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. महाराष्ट्र पोलीस दल हे समाजाच्या सुरक्षिततेसाठी सदैव कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.या वर्धापन दिन सप्ताहाच्या माध्यमातून पोलीस–जनता विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# तर्री-पोहा विथ देवाभाऊ';नागपूरच्या विकासावर रंगणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विशेष संवाद सोहळा;शहरात ५० ठिकाणी थेट प्रक्षेपण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी**
**नागपूर :** नागपूर शहराच्या शाश्वत विकासासाठी आणि सरकारच्या विकास कार्याबद्दल समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी थेट चर्चा करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत 'तर्री पोहा विथ देवाभाऊ' या विशेष संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय जनता पार्टी, नागपूर महानगरतर्फे आयोजित हा आगळावेगळा संवाद सोहळा गुरुवार, ८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता, सिव्हिल लाईन्स येथील पाम रोडवरील 'स्वागत लॉन' येथे संपन्न होणार आहे.व संपूर्ण संवाद कार्यक्रम भारतीय जनता युवा मोर्चा तर्फे शहरातली प्रमुख ५० चौकात स्क्रीन लावून नागरिकांसाठी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे अशी माहिती भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी




दिली. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्राचे लाडके नेतृत्व देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी होणारी थेट चर्चा. या संवादाला अधिक रंजक करण्यासाठी लोकप्रिय अभिनेत्री स्पृहा जोशी आणि सुप्रसिद्ध हास्य कलाकार भारत गणेशपुरे हे त्यांची विशेष मुलाखत घेणार आहेत.नागपूरच्या विकासाचे व्हिजन मांडतानाच, शहराची खास ओळख असलेल्या 'तर्री-पोहा'चा आस्वाद घेत हा अनौपचारिक गप्पांचा कार्यक्रम रंगणार आहे.भाजप नागपूर महानगरचे अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी शहरातील प्रतिष्ठित नागरिकांना या सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवण्याचे व शहराच्या प्रगतीत आपले विचार मांडण्याचे आवाहन केले आहे.शहरातील प्रमुख ५० चौकात थेट प्रक्षेपणा साठी युवामोर्चा तर्फे नियोजन केले असून त्या साठी युवामोर्चा अध्यक्ष सचिन करारे महामंत्री रितेश पांडे,रिषभ अरखेल,नागेश साठवणे,कुलदीप माटे,युवती प्रमुख प्रशंसा भोयर व महिला मोर्चा च्या दिव्या धुरडे,विशाखा जोशी,मनीषा अतकरे,वंदना शर्मा व अनिता काशीकर यांनी नियोजन केले आहे. शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी नागरिकांच्या सूचना आणि नेतृत्वाचा संवाद असा हा दुहेरी संगम या कार्यक्रमाच्या निमित्ताने नागपूरकरांना पाहायला मिळणार

# तळा येथे कोंकण विभागीय आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री मुले आणि मुली स्पर्धा यशस्वी संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तळा वार्ताहर :** मुंबई विद्यापीठ अंतर्गत तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा जि रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने कोंकण विभागीय आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री (मुले व मुली) स्पर्धा २०२५–२६ मोठ्या उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाल्या. या स्पर्धेत रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांतील मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेली एकूण २१ महाविद्यालये सहभागी झाली होती. यामध्ये १३ महाविद्यालये मुलांची तर ८ महाविद्यालये मुलींची होती. एकूण ८० खेळाडूंनी सहभाग नोंदविला असून त्यामध्ये ५० मुले व ३० मुली सहभागी होत्या. क्रॉस कंट्री मुले वैयक्तिक स्पर्धेत प्रथम क्रमांक स्वराज जोशी ए. पी. महाविद्यालय, चिपळूण, द्वितीय क्रमांक संदीप जोशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड तर तृतीय क्रमांक शिवम कुलाल ए. सी. एस. महाविद्यालय, लांजा यांनी पटकावला आहे. क्रॉस कंट्री मुली वैयक्तिक स्पर्धेत प्रथम क्रमांक निशा कुदळे ए. सी. एस. महाविद्यालय, लांजा, द्वितीय क्रमांक ऐश्वर्या लोंढे गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी व तृतीय क्रमांक हर्षदा पांचाळ ए. सी. एस. महाविद्यालय, लांजा यांनी मिळविला. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. मंगेश देशमुख होते. समवेत माजी अध्यक्ष श्री. चंद्रकांत रोडे उपस्थित होते. मुंबई विद्यापीठ कोंकण विभागाचे



सहसचिव व समन्वयक श्री. शशांक उपशेटे, कोंकण विभाग समिती सदस्य श्री. रामचंद्र कदम, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ भगवान लोखंडे, विविध महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच NSS स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ भगवान लोखंडे यांनी द ग तटकरे महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. याप्रसंगी क्रीडा शिक्षक श्री विजय तरटे, श्री पी पी कसबे, मुंबई विद्यापीठ कोकण विभागाचे सहसचिव तथा समन्वयक श्री शशांक उपशेटे, उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री मंगेश देशमुख यांनी खेळाडूंना खेळाचे महत्व पटवून दिले. मनोगत व्यक्त करतांना स्वराज जोशी, थापा, समन्वयक शशांक उपशेटे यांनी द ग तटकरे महाविद्यालयाच्या NSS स्वयंसेवक, क्रीडा शिक्षक भरत चाळके आणि तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी व द ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालायचे प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे सर्व खेळाडूंची उत्तम व्यवस्था केल्याबद्दल कौतुक केले. कार्यक्रमाचे निवेदन प्राध्यापिका डॉ तृप्ती थोरात तर आभार डॉ राजाराम थोरात यांनी मानले. बक्षीस समारंभानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आयोजक समिती, क्रीडा विभाग व स्वयंसेवकांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# आ. अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :मा**.आमदार अब्दुल सत्तार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त नॅशनल मेडिकल कॉलेज, सिल्लोड तर्फे मोफत आरोग्य शिबीर ग्रामीण रुग्णालय, सोयगांव येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरासाठी आजूबाजूच्या गावातील बहुसंख्य नागरिकांनी हजेरी लावून आपल्या आजाराचे निदान केले.आरोग्य शिबिराचे उदघाटन उपजिल्हाप्रमुख प्रभाकरराव (आबा) काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा आशाबी तडवी,रुग्ण



कल्याण समितीचे सदस्य रमेश गव्हाडे, शहर प्रमुख संतोष बोडखे, गटनेता अक्षय काळे, गोपीचंद जाधव,नगरसेवक हर्षल काळे, कदीर शहा, गजानन कुडके, लतीफ शहा, संध्याताई मापारी, ध्रुपताबाई सोनवणे, सुरेखा तायडे, योगेश पाटील,अमोल मापारी,समाधान काळे, शेख बबलू,संदीप चौधरी, प्रताप जाधव,किशोर मापारी, विनोद राठोड, सुनील निकम,भरत तायडे, नॅशनल मेडिकल कॉलेजचे डॉ.अहेमद शरीफ देशमुख, डॉ.अक्षय झवर,डॉ.अमन शहा, डॉ.रेणुका पायघन,डॉ.सना शेख, डॉ. दिव्या खोमणे,नंद वराडे,कविता टोम्पे, शितल शिंदे,अर्चना सपकाळ, दिव्या गायकवाड, अश्विनी दुधे,दीपाली राऊत, मनिषा बकले,जयश्री बकले, प्रतीक्षा गोफणे,कीर्ती गवई,भारती सुरे,जया अंदुरे, मुस्कान बेगम,कविता बकले, मिलिंद अहिरे,अभिजित बोर्डे,अभिषेक गाडेकर, शेख हुजेफ, मरिअम सैय्यद,अरबाज पठाण,अफरोज शेख आदींची उपस्थिती होती.

# पिल्लई कॉलेज, नवीन पनवेल येथे पनवेल शहर वाहतूक त्यांच्याकडून विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल.वार्ताहर :** पनवेल शहर वाहतूक शाखेमार्फत पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, न्यू पनवेल येथे एन एस एस विद्यार्थ्यांसाठी "सडक सुरक्षा, जीवन रक्षा" या विषयावर वाहतूक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन वाडेर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील, पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने व तुकाराम कदम तसेच पोलीस हवालदार युवराज येळे, अमीर मुलाणी, ज्ञानेश्वर पवार, केशव निकम व



हनुमंत आंधळे (पनवेल वाहतूक शाखा) उपस्थित होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी प्रोजेक्टरद्वारे पीपीटी सादरीकरणातून विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, रस्ते अपघातांची कारणे, वाहतूक चिन्हे, सिग्नल व प्रतिबंधात्मक उपाय यांची माहिती दिली. रस्ते अपघातांमुळे देशाच्या जीडीपी च्या सुमारे १ टक्का नुकसान होते व दर चार मिनिटांनी एका तरुणाचा मृत्यू होतो, असे धक्कादायक वास्तव त्यांनी मांडले.

कार्यक्रमात "रस्ते सुरक्षा ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, "हेल्मेट घाला, जीव वाचवा" व "वाहतूक नियम पाळा" असे महत्त्वाचे संदेश देण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांच्या मार्गदर्शनाखाली १५० एन एस एस विद्यार्थ्यांनी वाहतूक नियम पाळण्याची सामूहिक शपथ घेतली. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय डॉ. शबाब रिझवी, मुख्य एन एस एस कार्यक्रम अधिकारी यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक सुरक्षिततेबाबत प्रभावी जनजागृती निर्माण झाली.

# पोलीस वर्धापन दिन सप्ताह निमित्ताने विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : रा. जि.प उच्च प्राथमिक शाळा मोरबे, तालुका पनवेल येथे पनवेल तालुक्याचे पोलीस निरीक्षक इंगोले व त्यांचे सहकारी तसेच उपनिरीक्षक पी . डी. पवार व त्यांचे सहाय्यक राऊत यांनी पोलीस वर्धापनदिन सप्ताह निमित्ताने शाळेस भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. या कार्यक्रम प्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती मोरबे चे



अध्यक्ष बबन रामजी उलवेकर हे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सर्व पाहुण्यांचे यांचे स्वागत करण्यात आले. पोलीस वर्धापन दिन सप्ताह निमित्ताने विद्यार्थ्यांना सायबर क्राईमपासून स्वतःचे रक्षण, महिला सुरक्षितता मोहीम, मोबाईलचा योग्य वापर कसा करावा व मुलांवर होणारे अत्याचार याविषयी माहिती दिली. तसेच राऊत यांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन का व कसे करावे याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी चांगला नागरिक बनण्यासाठी प्रामाणिकपणा, कष्ट व देशभक्ती जोपासावी असे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना पीएसआय यांनी समर्पक अशी उत्तरे देत मुलांचा उत्साह वाढवला. या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता साळवी व सर्व शिक्षक उपस्थित होते. साळवी यांनी इंगोले, पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदा व सुव्यवस्थेबाबत जागरूकता निर्माण झाली असून सर्व ग्रामस्थ व पालकांनी या मार्गदर्शनाचे कौतुक केले आहे.

# एक मत रिक्षा चिन्हाला – जनतेच्या विकासाला – अमोल नालकोल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १६ (ड) मधून श्री. अमोल नालकोल हे रिक्षा च चिन्ह घेऊन अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उतरले असून, त्यांनी जनतेसमोर विकासाचा स्पष्ट अजेंडा मांडला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून जनसेवक म्हणून कार्यरत असलेल्या अमोल नालकोल यांनी नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. रिक्षा चालकांना परमिट मिळवून देणे, तक्रारी मार्गी लावणे,



पाणीटंचाईच्या काळात टँकरद्वारे पाणीपुरवठा करून देणे, तसेच गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी मदत करणे अशा अनेक सामाजिक प्रश्नांवर त्यांनी प्रत्यक्ष काम केले आहे."आजपर्यंत अनेक समस्या सोडवल्या असल्या तरी अजूनही बरेच प्रश्न प्रलंबित आहेत. नवीन पनवेलमधील नागरिक समस्या-मुक्त व्हावेत, हेच माझे ध्येय आहे," असे अमोल नालकोल यांनी सांगितले. यावेळी त्यांनी मतदारांना भावनिक आवाहन करताना म्हटले,"मायबाप जनतेला माझी नम्र विनंती आहे की, एकदा मला संधी द्या. मिळालेल्या संधीचे सोनं करून दाखवेन. तुमच्या समस्या सोडवण्यासाठी मी सदैव तुमच्यासोबत उभा राहीन."

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १६ (ड) मधील नागरिकांनी रिक्षा चिन्हाला मतदान करून प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन अमोल नालकोल यांनी यावेळी केले.

# पनवेल महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडीची जोरदार मुसंडी



**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडीची जोरदार मुसंडी मारताना दिसत आहे . प्रामुख्याने खांदा कॉलनी येथील प्रभाग 15 मधून महाविकास आघाडीचे शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) गटाचे उमेदवार शिवाजी दांगट व पूजा जाधव तसेच महादेव वाघमारे, श्रुती बंडगर यांनी प्रचारात जोरदार आघाडी घेतल्याची पहावयास मिळत आहे कार्यकत्यांच्या बळावर सहा महिन्यांपूर्वीच शिवाजी दांगट यांची उमेदवारी घोषित झाली होती . शिवसेना शाखा येथे सामाजिक कामातून त्यांनी आपली उमेद दाखवली सर्वांना सांभाळून व सोबथ घेणारा नेता अशी त्यांची शाखेमध्ये प्रतिमा तयार झाली आहे त्यांच्या शांत व संयमी स्वभावामुळे ते जनते मध्ये लवकर मिसळत आहे त्यामुळे जनतेने आपल्याला पाच वर्षे सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन ते ठिकठिकाणी करताना दिसत आहेत त्यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर खांदा कॉलनीतल प्रत्येक शाखाप्रमुखानी त्यांच्या प्रचारासाठी झोकून दिले आहे त्यामुळे सध्यातरी महाविकास आघाडी उमेदवार शिवाजी दांगट यानी प्रचारात मोठी आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे पूजा जाधव यांनी सुद्धा आपला सामाजिक कार्याच्या आधारे घराघरांत त्याचे कौटुंबिक संबंध आहेत . तसेच त्यांनी मराठा आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता .

# निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करावी - राज्य निवडणूक आयुक्त

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीकरिता पुरेशा प्रमाणात अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या सर्वांचे वेळेत प्रशिक्षणही पूर्ण झाले पाहिजे; तसेच प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्या अधिकारी- कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत.महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदान व मतमोजणीची तयारी आणि कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात सर्व 29 महानगरपालिका आयुक्त, संबंधित पोलिस आयुक्त व जिल्हा पोलिस अधीक्षक; तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची गेले दोन दिवस (ता. 6 व 7 जानेवारी) दूरचित्र संवादाच्या माध्यमातून (व्हीसी) बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा यांच्यासह आयोगातील विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते.श्री. वाघमारे यांनी सांगितले की, मतदान आणि मतमोजणीची प्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्यासाठी सर्वांचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. मतदान केंद्रांवर विविध व्यवस्था करण्याबाबतही सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांना अवगत करावे. मतदानासाठी येणाऱ्या मतदारांची गैरसोय होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घ्यावी. मतदान केंद्रावर विजेच्या उपलब्धतेबरोबरच पिण्याचे पाणी, सावली, शौचालयाची इत्यादींची व्यवस्था असणे आवश्यक आहे. शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्रे उभारण्यात यावित. मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्याबाळासह असणाऱ्या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य द्यावे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प आणि व्हिलचेअरसारख्या व्यवस्थाही असाव्यात.श्री. काकाणी यांनी सांगितले की, महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराची मुदत 13 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 5.30 वाजता संपणार असल्याने, त्यानंतर इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांसह अन्य कुठल्याही प्रसारमाध्यमांद्वारे निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत. त्यामुळे जाहीर प्रचाराच्या समाप्तीनंतर मुद्रित माध्यमांच्या जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनाचा किंवा परवानगीचा प्रश्न उद्भवत नाही. यासंदर्भातील सविस्तर बाबी राज्य निवडणूक आयोगाच्या 9 ऑक्टोबर 2025 रोजीच्या 'निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, 2025'मध्ये नमूद केल्या आहेत.

## सार्वजनिक सूचना

विषयः मुंबई महानगरपालिका निवासस्थान हस्तांतरण - श्री. नंदकुमार गंगाराम खळे यांचे कायदेशीर वारस/दावेदार यांना सूचना

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते कीः

श्री. नंदकुमार गंगाराम खळे, पुत्र गंगाराम खळे, मूळ भाडेकरू, मुंबई महानगरपालिका निवासस्थानः ८० टेनामेंट्स, चाळ क्रमांक ३, खोली क्रमांक ७, नेहरू नगर, गणपतराव कदम मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१८, यांनी दिनांक ०२/०९/२०१८ रोजी सदर निवासस्थानाचे भाडेकरू हक्क श्री. अमीन खान यांना हस्तांतरित केले आहेत.

हस्तांतरणाच्या वेळी श्री. नंदकुमार गंगाराम खळे अविवाहित होते आणि त्यांना कोणतीही मुले/वारस नव्हते.श्री. अमीन खान वर्ष २०१८ पासून सतत ताब्यात आहेत आणि औपचारिक हस्तांतरणासाठी अर्ज सादर केला आहे.

**सूचनाः**

श्री. नंदकुमार गंगाराम खळे यांचे कायदेशीर वारस किंवा सदर निवासस्थानावर कोणताही हक्क/दावा/आक्षेप असणाऱ्या व्यक्तींनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांत योग्य पुराव्यासह खालील पत्त्यांवर प्रतिसाद द्यावाः

१. मालमत्ता अधिकारी, जी/दक्षिण प्रभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई - ४०००१३.

२. श्री. अमीन खान, ८० टेनामेंट्स, चाळ क्रमांक ३, खोली क्रमांक ७, नेहरू नगर, एस.एस. अमृतवार मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१८. मोबाईलः ७७१०९६३१६३

१५ दिवसांत प्रतिसाद न मिळाल्यासः कोणतेही वारस/दावे नाहीत असे गृहित धरून हस्तांतरण प्रक्रिया पुढे चालू राहील. भविष्यातील दावे फेटाळले जातील.

**जारीकर्ताः श्री. अमीन खान**
**मोबाईलः ७७१०९६३१६३**
**दिनांकः०८/०१/२०२६**
**कायदेशीर सल्लागारः ॲड. वेंकटेश देवेंद्र**



मंगळवार दिनांक 6 जानेवारी 2020 रोजी सायंकाळी सात ते नऊ वाजता ओम शिव साई गणेश मंदिर, समाज कल्याण हॉलच्या जवळ, बर्वे नगर कॉलनी ए, भटवाडी घाटकोपर पश्चिम येथे ह भ प श्री ऋषिकेश विकास वायाळ यांचे कीर्तन संपन्न झाले सदर कीर्तनामध्ये नाम अनग्रह प्रबोध अष्टसात्विकभाव सद्गुरु, मोक्ष, चार वेद सहा शास्त्र 18 पुराने यांना अनुसरून व प्रमाण मानून दृष्टांत सिद्धांत सांगितले ज्ञानेश्वरी , भागवत, गीता, अमृतानुभव, कठोपनिषद, तुकाराम गाथा, हरिपाठ , काकडा व इतर असा दशग्रंथी अभ्यासपूर्ण कीर्तन संपन्न झालेकीर्तनकार ह भ प गणेश पोपट चकवे यांनी ऋषिकेश विकास वायाळ यांचा हार घालून सत्कार केला

( दैनिक युवक आधार )

# दारूअड्ड्यांमुळे गावात महिलांचे जगणे असुरक्षित

## “संध्याकाळ झाली की घराबाहेर पडायची भीती वाटते” — जऊळका हद्दीतील महिलांचे वास्तव

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** जऊळका (वाशिम ) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खेड्यांमध्ये सुरू असलेल्या अवैध देशी व विदेशी दारूविक्रीमुळे महिलांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र समोर येत आहे. गावातील अनेक महिलांच्या म्हणण्यानुसार, संध्याकाळनंतर घराबाहेर पडणे धोक्याचे वाटू लागले असून भीती, अस्वस्थता आणि असुरक्षिततेची भावना वाढली आहे.



एका गावातील महिलांनी सांगितले की, दारूच्या नशेत असलेली मंडळी रस्त्यावर उभे राहून ये-जा करणाऱ्या महिलांकडे टक लावून पाहणे, अश्लील टिप्पणी करणे, शिवीगाळ करणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. “कामावरून परतताना किंवा किराणा आणायला गेल्यावर नजर चुकवून चालावे लागते,” असे एका महिलेनं सांगितले. काही ठिकाणी तर रस्ते बदलून जाण्याची वेळ येते, अशीही भावना महिलांनी व्यक्त केली.

दारूअड्ड्यांमुळे घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचेही महिलांचे अनुभव सांगतात. दारू पिऊन घरी येणारे पुरुष वाद घालणे, मारहाण करणे, खर्चासाठी दबाव टाकणे यामुळे अनेक घरांत शांतता उरलेली नाही. “मुलांसमोर भांडणं होतात, अभ्यासावर परिणाम होतो,” असे एका आईने सांगितले. काही महिलांनी तर कर्जबाजारीपणाची, रोजच्या खर्चाची चिंता व्यक्त केली.

महिलांच्या मते, तक्रार करायची इच्छा असूनही भीतीमुळे आवाज उठवता येत नाही. “तक्रार केली तर उद्या त्रास वाढेल,” अशी भीती अनेक जणींना वाटते. काहींनी सांगितले की, तोंडी तक्रारी केल्यानंतर परिस्थितीत बदल दिसला नाही; उलट दारूअड्डे अधिक बिनधास्त सुरू असल्याचे जाणवते.

गावातील महिला बचत गटांतील सदस्यांनीही चिंता व्यक्त केली. त्यांच्या मते, दारूअड्ड्यांमुळे महिलांच्या रोजगारावर परिणाम होत आहे. स्वयंरोजगारासाठी बाहेर पडणे, बैठकांना जाणे, उशिरापर्यंत काम करणे कठीण झाले आहे. “आम्हाला सुरक्षित वाटत नाही,” असे त्या म्हणाल्या.

महिलांनी एकमुखाने सांगितले की, कायदा आमच्यासाठी असायला हवा, पण प्रत्यक्षात आम्हीच असुरक्षित आहोत. दारूअड्डे बंद झाले तर गावात शांतता परत येईल, मुलांचे भविष्य सुरक्षित होईल आणि महिलांना मोकळेपणाने वावरता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या पार्श्वभूमीवर महिलांची स्पष्ट मागणी आहे की, अवैध दारूविक्री तातडीने थांबवावी, दारूअड्ड्यांवर कठोर कारवाई करावी आणि महिलांच्या सुरक्षिततेस प्राधान्य द्यावे. “आम्हाला संरक्षण हवे, आश्वासन नको,” असा ठाम सूर महिलांच्या अनुभवांतून उमटत आहे.

## वाशिम शहराच्या सुरक्षेला अनुभवी नेतृत्व

# ठाणेदार संजय चौधरी यांच्या कार्यशैलीतून प्रशासन–नागरिकांमध्ये विश्वासाचे नाते

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम शहरी पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी संजय चौधरी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक बळकट होण्याची सकारात्मक अपेक्षा निर्माण झाली आहे. प्रशासकीय कामकाजातील अनुभव, नागरिकांशी संवाद साधण्याची शैली आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी यामुळे संजय चौधरी यांची ओळख एक संवेदनशील, तत्पर व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून आहे.

शहरातील महिला सुरक्षा, सार्वजनिक शांतता, वाहतूक नियंत्रण, तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवणे या महत्त्वाच्या बाबींवर त्यांनी सुरुवातीपासूनच लक्ष केंद्रित केले आहे. विशेषतः महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे, तक्रारींवर तात्काळ दखल घेतली जावी आणि पोलीस ठाणे हे विश्वासाचे केंद्र ठरावे, या दृष्टीने त्यांची भूमिका स्पष्ट आहे.

नागरिकांशी संवाद साधताना “पोलीस हे जनतेचे रक्षक आहेत” हा दृष्टिकोन त्यांनी कायम ठेवला आहे. व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्याशी थेट संवाद साधून समस्या समजून घेण्यावर त्यांचा भर आहे. त्यामुळे प्रशासन व नागरिक यांच्यातील



दरी कमी होण्यास मदत होत असल्याचे शहरवासीयांकडून सांगितले जात आहे. कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने नियमित गस्त, संवेदनशील ठिकाणी विशेष लक्ष, तसेच प्रतिबंधात्मक कारवाई यामुळे शहरात शिस्तबद्ध वातावरण निर्माण होण्यास हातभार लागत आहे. प्रशासनाच्या निर्णयांमध्ये पारदर्शकता आणि कायद्याचे काटेकोर पालन ही संजय चौधरी यांच्या कार्यशैलीची ठळक वैशिष्ट्ये मानली जातात.

नागरिकांचे म्हणणे आहे की, “ठाणेदार संजय चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस प्रशासन अधिक सक्रिय आणि approachable झाले आहे. तक्रारी ऐकून घेण्याची पद्धत सकारात्मक आहे, ज्यामुळे विश्वास वाढतो आहे.”अनुभव, कार्यक्षमता आणि संवेदनशीलता यांचा समतोल साधत ठाणेदार संजय चौधरी वाशिम शहरासाठी सुरक्षित, शांततामय आणि विश्वासार्ह प्रशासन उभे करतील, अशी अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात 'दर्पणकार' जयंती उत्साहात; पत्रकारांचा यथोचित सत्कार

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर /सिल्लोड** | आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी पत्रकारितेचा पाया रचला. त्यांचे कार्य समाजासाठी दीपस्तंभासारखे आहे, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. स्थानिक श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात ६ जानेवारी रोजी 'पत्रकार दिन' आणि बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त तालुक्यातील पत्रकारांच्या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक कृष्णा सपाटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री छत्रपती शिवाजी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन डमाळे व सेवानिवृत्त शिक्षक रमेश सोनवणे यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



याप्रसंगी तालुक्यातील विविध दैनिक व साप्ताहिकांच्या संपादक व प्रतिनिधींचा विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला . यामध्ये सर्वश्री:संजय कुलकर्णी, सचिन चौबे, श्यामकुमार पुरे, रवींद्र सोनवणे, प्रशांत क्षीरसागर, निलेश सोनटक्के, प्रकाश वराडे, मन्सूर कादरी, जावेद सौदागर, शिवाजी डापके, सोहेल कादरी,दशरथ सुरडकर ,योगेश पालोदकर,गजानन मरकडे, अनिल कुलकर्णी, प्रा. वाकेकर, दत्ता ढोरमारे, सय्यद हरून आली, विलास नलावडे, चांद सर, तोशिफ सर, आजम पठाण, जी.टी. वाघ, बाबा देशमाने, शब्बीर पटेल या पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

पत्रकार मन्सूर कादरी आणि संजय कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतातून पत्रकार दिनाचे महत्त्व विशद केले. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची जबाबदारी आणि सामाजिक बांधिलकी यावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक कृष्णा सपाटे यांनी पत्रकारांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन गजानन दौड यांनी केले, तर आभार गणेश चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक निशांत म्हस्के, श्रीमती संगीता तायडे, श्रीमती संगीता काळे, मधुकर मगर, लक्ष्मण कोलोड, नरेश सिंग राजपूत, रमेश परदेशी, अंगद काळे, अमोल ताटू, अरविंद सोनवणे, भास्कर सागरे, पंकज सावंत, श्रीमती वडमारे, श्रीमती हर्षदा सानांसे, अमोल दांडगे, राजू गाढवे, भाऊसाहेब गावंडे, अमोल पालोदकर व गणेश सुरडकर यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने इयत्ता चौथी व सातवी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना जाहीर

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** महाराष्ट्र परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने इयत्ता चौथी व सातवी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ३० /१२/ २०२५ च्या परिपत्रकानुसार शहरी व ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांना सामोरे जाता यावे व त्यांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टिकोनातून सध्या सुरू असणारी पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेच्या धरतीवरच यावर्षी दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळातील सर्व विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त या परीक्षेत सहभाग घेऊन भविष्यासाठी यश संपादन करावे त्यासाठी शासनाने चौथी इयत्तेसाठी रोख रक्कम रुपये ५००/- तर सातवीसाठी रोख रक्कम रुपये ७५०/- शिष्यवृत्ती जाहीर केली आहे. तरी या योजनेचा लाभ जास्तीत जास्त शाळांनी व विद्यार्थ्यांनी घ्यावा. असे आवाहन परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी www.mscepune.in किंवा http://puppssmsce.in या वेबसाईटला भेट देऊन योग्य ती माहिती घेऊन त्वरित आपली नोंदणी करावी. असे आवाहन उरण तालुक्याच्या कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत मॅडम




यांनी संपूर्ण तालुक्यातील शिक्षक वृंदांना तसेच पालकांना केले आहे.

# पिंपळा येथील पत्रकार करण धोंगडे यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**रणजीत ठाकुर /रिसोड तालुका प्रतिनिधी :** मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या पत्रकार दिनाचे औचित्य साधून निर्भय व राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला.हा मानाचा पुरस्कार पत्रकार करण धोंगडे यांना टायगर ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष तानाजी भाऊ जाधव तसेच राष्ट्रीय युवा ग्रामीण संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या शुभहस्ते पुणे येथे प्रदान करण्यात आला.




ग्रामीण भागातील विविध ज्वलंत प्रश्न,सामाजिक अन्याय, प्रशासकीय अडचणी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या निर्भयपणे मांडत सातत्यपूर्ण व वस्तुनिष्ठ पत्रकारिता केल्याबद्दल करण धोंगडे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

त्यांच्या लेखनामुळे अनेक जनहिताच्या विषयांना न्याय मिळाला असून प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यास त्यांची पत्रकारिता उपयुक्त ठरली आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन निर्भय व राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर,संघाचे पदाधिकारी, ज्येष्ठ पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते. यावेळी पत्रकारितेतील नैतिक मूल्ये, समाजाप्रती असलेली जबाबदारी आणि निर्भय पत्रकारितेचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, आजच्या काळात सत्य,निर्भयता आणि सामाजिक बांधिलकी जपणारी पत्रकारिता समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे.करण धोंगडे यांची पत्रकारिता ही नवोदित पत्रकारांसाठी प्रेरणादायी असून ग्रामीण पत्रकारितेला नवी दिशा देणारी आहे,असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

पुरस्कार स्वीकारताना करण धोंगडे यांनी हा सन्मान सर्व वाचक,सहकारी पत्रकार व समाजातील सामान्य घटकांना समर्पित करत,भविष्यातही निर्भयपणे आणि प्रामाणिकपणे पत्रकारिता करण्याचा संकल्प व्यक्त केला.

निर्भय व राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने भविष्यातही समाजहितासाठी कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करण्यात येईल,अशी माहिती संघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

## १८ वे भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात कृषिरत्न पुरस्काराने अतुल महादेव तळेकर यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**भीमराव गावंडे/गेवराई प्रतिनिधी :** गेवराई प्रतिनिधी-साई गावडे :मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आयोजित १८ वे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन 1 जानेवारी ते 5 जानेवारी दसरा मैदान गेवराई येथे पार पडले. या पाच दिवसांच्या प्रदर्शनात शेतकरी बांधवांसाठी कृषी तंत्रज्ञान, नवीन उपकरणे, बी-बियाणे, सिंचन प्रणाली, आणि आधुनिक शेती विषयक माहितीचे अनेक स्टॉल आणि सत्रे आयोजित करण्यात आली होती. राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन किसान



कृषी विकास प्रतिष्ठान, गेवराई यांच्या वतीने स्वर्गीय कृषीरत्न गणेशराव बेद्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ केले गेले, ज्यामध्ये राज्यभरातून शेतकरी आणि कृषी क्षेत्राशी निगडित सहभागींची उपस्थिती होती.

या वर्षी आयोजित या प्रदर्शनामध्ये कृषिरत्न पुरस्काराने 11 शेतकऱ्यांचा कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार सन्मान करण्यात आला यापैकी मादळमोहीतील प्रगतशील शेतकरी श्री अतुल महादेव तळेकर यांना त्यांच्या उत्कृष्ट कृषी कामगिरीबद्दल कृषिरत्न पुरस्काराने सन्मानितकेले गेले. त्यांच्या उपक्रमांनी शेतकऱ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून आणण्यास मदत केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून या गौरवप्रसंगी संघर्ष योद्धा श्री.मनोज दादा जरांगे पाटील ,गेवराईचे आमदार मा. विजयराजे पंडीत,जि.प.सदस्य मा. बप्पासाहेब आण्णा तळेकर, गंगा माऊली साखर कारखान्याचे मा.राहुल सोनवणे पाटील आणि मा.महेशराव बेद्रे पाटील श्री राजेंद्र आतकरे ,कार्याध्यक्ष श्री.अजय दाभाडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

या प्रदर्शनात विविध कृषी तंत्रज्ञान, पिकांवरील प्रात्यक्षिके, चर्चासत्रे, पशुपालन संबंधित सत्रे यामुळे शेतकरी समुदायास नवीन माहितीचा लाभ मिळाला.

प्रदर्शनाला उपस्थिती वाढवण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळाला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पत्रकारांच्या समस्यांबाबात राज्यपालांची भेट घेणार - खासदार अमर काळे

## "पत्रकार संरक्षण समिती"च्या वतीने पत्रकार दिनाचे आर्वी येथे आयोजन...!

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी वर्धा -** अन्यायला वाचा फोडण्याचे कामं करणारा ग्रामीण पत्रकार हा खऱ्या अर्थाने संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेच्या विचारावर जगतो, ग्रामीण विकासासाठी पत्रकारांचा कायमच संघर्ष राहिलेला आहे. त्याकामी विधिमंडळात पत्रकारांचा प्रतिनिधी असणं आवश्यक आहे. त्या कामी मला आपले पत्र दया मी स्वतः राज्यपाल यांना भेटून हा प्रश्न तडीस नेण्यासाठी तुमच्या सोबत आहे. ग्रामीण पत्रकार हे गावपातळीवरील अडी-अडचणीचे जाणकार असतात, म्हणून मी त्यांना समाजाचे टॉनिक म्हणतो असे विचार खासदार अमर काळे यांनी मांडले.पत्रकार संरक्षण समिती महाराष्ट्र राज्य यांच्या संयोजनातून पत्रकार महर्षी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मदिनानिमित्त होणारा कार्यक्रम (दि.६ जानेवारी २०२६ रोजी) आर्वी जि. वर्धा येथे उत्साहात झाला.यावेळी विदर्भातील कृतिशील पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव शाल,पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या कार्याबद्दल गौरवं करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे होते तर उदघाट्न खासदार अमर काळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मान्यवर म्हणून आमदार दादाराव केचे,जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड,आर्वीच्या नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने,शेतकरी आरक्षणाचे प्रणेते शैलेश अग्रवाल, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रकांत ढोले,तहसीलदार हरीश काळे,राज्य उपाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते राम खुर्दळ, डॉ.सय्यद मजीद,युवा पत्रकार आशिष घुमे,पत्रकार संरक्षण समिती वर्ध्याचे कार्याध्यक्ष सत्तार शेख,जिल्हाध्यक्ष शशांक चतारे, इत्यादी मान्यवर व्यासपीठावर होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुष्प वाहून पूजन करण्यात आले.व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून पत्रकार दिन- २०२६ चे औपचारिकता उदघाटन करण्यात आले.मान्यवरांच्या स्वागतानंतर अनेक स्वागतमूर्तिनी आपापले कार्य व पत्रकारितेतील अनुभवं मांडले.त्यानंतर आमदार दादाराव केचे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,'बदलत्या काळात आपल्याकडून सर्वांनाच खूप अपेक्षा आहे. मात्र लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला ग्रामीण पत्रकारितेच्या कष्टाची जाणीव आहे'. पोलीस उपअधीक्षक चंद्रकांत ढोले यांनी सांगितले की "पत्रकार समाज व सरकार यामधील दुवा आहे. लेखणीद्वारे तो सातत्याने उपेक्षिताचे मुद्द्याना वाचा फोडतो'. शेतकरी नेते शैलेश अग्रवाल यांनी सांगितले की ग्रामीण पत्रकार हा शेतकरी, गाव खेड्यातील विद्यार्थी यांचे सारखा उपेक्षित घटक आहे, त्याला संरक्षण मिळणे



आवश्यक बाब आहे, त्याच्या कौटुंबिक आर्थिक स्थितीचा ही शासनाने विचार करावा.शेतकरी कष्टकऱ्यांचा आवाज असलेला ग्रामीण पत्रकार यांना मूलभूत सेवा दिलीच पाहिजे.अधिस्वीकृतीत ग्रामीण पत्रकार व कार्यालयीन कोट्यातून अधिस्वीकृती घेणारा शहरी पत्रकार असा भेद नको,या खडतर मार्गातील ग्रामीण पत्रकाराना न्याय मिळाला पाहिजे'.तत्पुर्वी पत्रकार दिनाचे मुख्य वक्ते, पत्रकार संरक्षण समितीचे राज्य उपाध्यक्ष राम खुर्दळ यांनी "ग्रामीण पत्रकारितेचे आजचे वास्तव" विषयावर मांडणी करताना सांगितले की,पाच महिने पूर्वी ग्रामीण पत्रकाराचे राज्यस्तरीय विचार संमेलनाची आठवण करून देतांना राज्यशासन,मंत्री आमदार खासदार यांना निवेदन दिले मात्र विषयांचे गांभीर्य अजूनही लोकप्रतिनिधीना समजले नाही,हिवाळी अधिवेशनात याबद्दल तारांकित मुद्दा उपस्थित केला नाही,आम्ही रस्त्यावर येऊन मूलभूत मुद्द्यासाठी लढतोय,मात्र शासकीय सेवा अधिस्वीकृतीधारकांना मिळतात, आम्ही कायमच वंचित राहिलोय. अजूनही पत्रकार हल्लाविरोधी कायद्याचा लाभ ग्रामीण पत्रकाराना का नाही?वैयक्तिक व कौटुंबिक विमा, पेन्शन सरकार देत नाही,ग्रामीण पत्रकाराना अधिस्वीकृती मिळत नाही त्यासाठी जाचक अटी शर्ती आहेत, ग्रामीण पत्रकारावर हल्ले झाल्यास त्याला आधार नसतो मात्र बड्या पडस्थ पत्रकाराना ग्रामीण पत्रकार नेहमी आधार देतात,ग्रामीण पत्रकाराना राज्यभर स्वतंत्र्य पत्रकार भवन नाही,आर्थिक दुर्बल ग्राम पत्रकाराना घरकुल योजना का नाही? पत्रकार अपघात झाल्यास आजारी पडल्यास त्याला शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे? विविध अशासकीय समित्यावार आम्हांला डावलले जाते.जिल्हा माहिती कार्यालयात ग्रामीण पत्रकार नोंद नसते,शासकीय प्रेसला ते ग्रामीण पत्रकाराना उभं ही करीत नाही आम्ही पाठपुरावा करतोय पण सरकार त्यांचे नेते,माहिती विभाग आमची उपेक्षा करत आहे.

पत्रकार संरक्षण समितीच्या पत्रकार दिनी सक्रिय पत्रकार व समाजसेवक यांचा गौरवं झाला यामध्ये सत्कार मुर्ती पत्रकार सौ.उज्वला घोडे,निरज त्रिपाठी,गोल्ड मॅडलिस्ट पत्रकार अमोल सोटे,गणेश शेंडे,डॉ. प्रकाश राठी,बबलु खान,सुधाकर बोबडे,राजु कांबळे,रा. मोझरी (शेकापुर),संतोष देशमुख,नरेश चरडे,रवि साखरे,शेख युसुफ शेख ईशाफ तर समाज सेवक म्हणून अरूण कहारे,डॉ. सैय्यद अबरार सैय्यद मजीद,नितीन बनकर, चंद्रमणी मुन,नितीन चंदनखेडे, परमेश्वर नरवटे,रामेश्वर पडोळे,राजश्री जमनारे तसेच विशेष सामाजिक सत्कार मुर्ती आर्वीच्या नगराध्यक्षा स्वाती प्रकाश गुल्हाणे,डॉ. रिपल राणे, युवा समाजसेवक आशीष घुमे वरोरा, सपना नरेंद्र मांडवकर यांचा सत्कार करण्यात आला.सर्व सत्कार मूर्तीना सन्मानचिन्ह स्व.जमनाबाई मोहनलालजी जावंधीया स्मृती प्रित्यर्थ शेतकरी नेते विजय जावंधीया व दैनिक विधाताचे संस्थापक स्व.डॉ. मोहनलाल जैन स्मृती प्रित्यर्थ पत्रकार प्रदिप जैन यांचे कडून देण्यात आले.

या कार्यक्रमात विदर्भ सहसचिवपदी रवि चरडे व जिल्हा प्रवक्ते म्हणून ग्रामगितचार्य गजानन भोरे यांच्यासह आर्वी,आष्टी,कारंजा (घाडगे) या तालुक्यातील पत्रकारांच्या नियुक्ती करण्यात आल्या व त्यांचा ओळखपत्र देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामीण जिल्हाध्यक्ष संदिप रघाटाटे व संचालन प्रा. कल्याणी संजय वानखेडे यांनी केले.तर आर्वी तालुका अध्यक्ष प्रा. राजेश सोळंकी यांनी सर्वांचे आभार मानले.कार्यक्रमाला जिल्हा सचिव योगेश कांबळे,जिल्हा उपाध्यक्ष जितू गोरडे,जिल्हा संघटक प्रशांत आजनकर,जिल्हा कोषाध्यक्ष सतिश काळे,जिल्हा सहसचिव इकबाल शेख,जिल्हा प्रवक्ते गजानन भोरे, जिल्हा महिला सचिव आरती कारंजेकर,जिल्हा सहसंघटक राहुल मून,प्रविण करोले,प्रशांत अवचट, तालुकाध्यक्ष संजीव वाघ,प्रा. प्रदिप झुटी,शिवाजी चंदीवाले,गजानन जिकार,विवेक हांडे,बाळू मुंगले, जगदीश कुर्डा,ओंकार दंडाळे,सय्यद सर व जिल्यातील पत्रकार बांधव मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इकबाल शेख,पंकज गोडबोले,मनोज राऊत, टेकचंद मोटवानी,दिनेश सोळंके, नारायण घोडे यांनी परिश्रम घेतले.

## संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**उल्हासनगर(रशिद शेख) :** कल्याण तालुक्यातील पावशेपाडा येथे दि. ४ जानेवरी रोजी संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथा सुरु झाली सर्व वैचारिक व सर्व धर्म समभाव या कथेतुन एक उद्देश हा या ज्ञानेश्वर माऊलींच्या कथेतुन सर्वांना बोध देण्यात आला या चार दिवसांच्या कथेतुन बरंच काही जण जागृती संदेश मिळाला या वेळी गावचे प्रथम जेष्ठ  नागरिक, तरुण व बाळं गोपाळ महिला मंडळ सदस्य,तथा सर्व गावकरी ग्रामस्थ सह पंचक्रोशीतील हजारो भाविक सहभागी होते. हजारो भाविकांच्या संख्येत महाप्रसादाचा लाभ घेतला आहे कल्याण तालुक्यातील पावशे पाडा हे आगदी नदी काठावरील बसलेले गावं आहे इथे सर्वच एक जुटिने गड्या गोविंदाने नांदत



आहे पावशे पाड्यातील समाज कार्यासाठी एक नंबर आहे मगं कोणाचें लग्न असो की दवाखाना असो गावांतील भाविक कार्यक्रम असो किंवा गोरं गरिबांचे कुटुंबाचे लग्न असो सर्वच एक ठिकाणी येऊन हनुमान मंदीरात बसुन आपले सामाजिक कार्याची चर्चा करुन आपले हाती घेण्यात आलेले मदतीचा हात फुलं नाही तर फुलांची पाकळी देउन कामं पूर्ण पणाने आगदी आनंदानें पार पाडतात म्हणून या गावांची खरी ओळख आहे पावशे पाड्याचें भूमिपुत्र अन्न दाते

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा प्रभाग २ मध्ये प्रचार दौरा; मतदार व कार्यकर्त्यांशी थेट संवाद, महायुतीच्या उमेदवारांना बळ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २ मध्ये भाजप महायुतीचा प्रचार जोरात सुरू असून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मतदार व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत प्रचाराला नवी ऊर्जा दिली. त्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण प्रभागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

प्रभाग क्रमांक २ मधून भाजप महायुतीचे उमेदवार दिनेश खानावकर, कृष्णा पाटील, काजल पाटील आणि अरुणा दाभणे निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्या प्रचारासाठी आयोजित दौऱ्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, वाय. टी. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना रामशेठ ठाकूर म्हणाले की, पनवेलचा सर्वांगीण व वेगवान विकास साधायचा असेल तर केंद्र, राज्य आणि महापालिका या 'ट्रिपल इंजिन' सरकारची ताकद सत्तेवर असणे आवश्यक आहे. यापूर्वी महापालिकेत आपले ६६ नगरसेवक होते. यंदाच्या निवडणुकीत केवळ ६६ वर न थांबता त्याहून अधिक नगरसेवक निवडून



आणण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. त्यासाठी महायुतीच्या उमेदवारांनी घरोघरी जाऊन केलेल्या विकासकामांची माहिती मतदारांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

पुढे बोलताना ते म्हणाले, आता मी आणि जे. एम. म्हात्रे एकत्र आलो असून त्यामुळे आपली ताकद अधिक वाढली आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय तसेच इतर मित्रपक्षांचीही मजबूत साथ महायुतीला लाभत आहे. त्यामुळे या प्रभागातील चारही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रचार दौऱ्यात भाजप नेते जितेंद्र म्हात्रे, महेश पाटील, अशोक साळुंखे, राजू शेळके, रामदास फडके, काळूराम फडके, महेंद्र म्हात्रे, आकाश फडके, रूपेश फडके, विजय म्हात्रे, विजय पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीवर्धन-कुंभारआळी रस्त्यावर अस्वच्छतेचा विळखा; नागरिकांचं आरोग्य धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीतील कुंभारआळी मिनीडोर स्टॅन्डलगतचा परिसर सध्या तीव्र स्वच्छता समस्येने ग्रासलेला आहे. कुंभारआळी येथून वाघजाई मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा, साचलेली घाण व पाणी साठल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे या मार्गावरून जाणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.



या दुर्गंधीचा फटका विद्यार्थी, प्रवासी, स्थानिक दुकानदार तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांना बसत असून, त्यांच्या दैनंदिन कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत अनेकदा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे.अस्वच्छतेमुळे परिसरात डासांची उत्पत्ती वाढत असून, साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे मंदिर परिसर व वर्दळीच्या रस्त्यालगत अशी अवस्था असल्याने शहराच्या स्वच्छतेच्या प्रतिमेलाही धक्का बसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून साचलेला कचरा उचलावा, नियमित कचरा व्यवस्थापनाची अंमलबजावणी करावी तसेच भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी ठाम मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महागाव येथे आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव : (यवतमाळ) :** मराठी पत्रकारितेचे जनक थोर समाजसुधारक आणि 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती मंगळवारी महागाव येथील शासकीय विश्रामगृहात उत्साहात साजरी करण्यात आली. महागाव तालुका पत्रकार महासंघाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात पत्रकार दिन साजरा करण्यात आला. जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय भगत होते, तर प्प्रास्ताविक गजानन वाघमारे यांनी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरपंचायत उपाध्यक्ष उदय नरवाडे यांनी उपस्थित पत्रकारांचा पेन व डायरी




देऊन सन्मान केला, बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू करून समाजप्रबोधनाची चळवळ उभी केली. वक्त्यांनी त्यांच्या पत्रकारिता, शिक्षण व समाजजागृतीतील योगदानाचा गौरव केला. यावेळी सत्यनिष्ठ व लोकहितवादी पत्रकारितेचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्यात आला. महागाव परिसरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजु पाटील राजे जनसंपर्क कार्यालयात भाजपाचे नवनिर्वाचित नगरसेवक कुणालजी हेडा यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** आज राजु पाटील राजे जनसंपर्क कार्यालय, वाशिम येथे भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित नगरसेवक मा. कुणालजी हेडा यांचे पुष्पगुच्छ देऊन व मनःपूर्वक शुभेच्छा देत अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या विजयाबद्दल उपस्थित मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीत जनतेचा विश्वास संपादन करून कुणालजी हेडा यांनी दणदणीत विजय मिळवला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ते सातत्याने कार्य करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.या प्रसंगी बोलताना उपस्थितांनी सांगितले की, कुणालजी हेडा यांचे नेतृत्व, कार्यक्षमता व लोकसंपर्क यामुळेच त्यांना जनतेचा भरघोस पाठिंबा



मिळाला आहे. नागरिकांच्या समस्या सोडवणे, मूलभूत सुविधा मजबूत करणे तसेच विकासकामांना गती देणे यासाठी ते कटिबद्ध राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.राजु पाटील राजे जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या अभिनंदन सोहळ्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. भाजपाची संघटनात्मक ताकद अधिक बळकट करण्यासाठी अशा कार्यक्रमांमधून नवचैतन्य निर्माण होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## जेएनपीए चा' ग्रीन सिग्नल' पर्यावरण स्नेही बंदरासाठी जागतिक भागधारकांसोबत धोरणात्मक मंथन!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण :** देशातील अग्रगण्य जवाहरलाल नेहरू पोर्ट अथोरिटीने आता पूर्णतः पर्यावरण स्नेही उद्योग करण्याचा संकल्प केला आहे. बंदराच्या महत्त्वाकांशी ग्रीन पोर्ट मोहिमेचा आणि विविध शाश्वत उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी मंगळवार दिनांक ६जानेवारी २०२६ रोजी जेएनपीए प्रशासन भवनात प्रमुख भागधारकांची बैठक संपन्न झाली .

धोरणात्मक चर्चा आणि भावी वाटचाल :या बैठकीत प्रामुख्याने बंदराच्या शाश्वत विकासाशी संबंधित विविध धोरणात्मक विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये कंटेनर टर्मिनल ऑपरेटर कंटेनर शिपिंग लाईन्स आणि इतर प्रमुख भागधारकाने उपस्थिती लावली होती. बदलते जागतिक प्रवाह आणि बंदर क्षेत्रातील आधुनिक घडामोडी लक्षात घेऊन भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहे त्यावर प्रदीर्घ विचार विनिमय करण्यात आला.

**हरित इंधनावर चालणाऱ्या जहाजांचे स्वागत :**

जागतिक शिपिंग उद्योगात सध्या स्वच्छ आणि पर्यायी इंधनाचा वापर वेगाने वाढत आहे. भविष्यात हरित इंधनावर चालणाऱ्या जहाजांची जेएनपीए बंदरातील आवक वाढण्याची शक्यता गृहीत धरून त्यांच्यासाठी लागणाऱ्या विशेष सुविधा आणि दीर्घकालीन नियोजनाबाबत भागधारकांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. विविध प्रकारच्या शाश्वत इंधनाचा स्वीकार करण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा झाली. केवळ औद्योगिक विकासाच नव्हे तर पर्यावरण रक्षण हेच यशाचे गमक असल्याचे जेएनपीए ने या बैठकीतून सिद्ध केले आहे .सर्व भागधारकांच्या समन्वयातून आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर जेएनपीए



आता जगातील सर्वात सुरक्षित आणि "हरित बंदर" बनण्याच्या दिशेने वेगाने पावले टाकत आहे. शाश्वत भविष्यासाठी जेएनपीए ने सुरू केलेले हे "मिशन ग्रीन" संपूर्ण जागतिक शिपिंग क्षेत्रासाठी एक नवे दीपस्तंभ ठरेल. असा विश्वास या बैठकीच्या सांगते वेळी व्यक्त करण्यात आला.

# ऐन हिवाळ्यातच स्थलांतरित पक्षांची पाठ : पक्षी प्रेमींमध्ये निराशा


**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** सातत्याने होत असलेल्या हवामानातील बदलामुळे हजारो स्थलांतरित पक्षांनी यंदा उरणकडे पाठ फिरवली आहे.यामुळे दरवर्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करुन येणाऱ्या विविध स्थलांतरित पक्षांचे यंदा दर्शन दुर्लभ झाले आहे. त्यामुळे मात्र पक्षी प्रेमींमध्ये सध्या तरी निराशेचे वातावरण आहे.

रायगड जिल्ह्यातील उरण परिसरात जेएनपीए , पाणजे, डोंगरी, गव्हाण-न्हावा,करंजा खाडी- किनारा आणि पाणथळी जागा, जलाशय आदी अनेक ठिकाणे स्थलांतरीत पक्षांची आश्रयस्थाने आहेत.पाणथळी आणि जलाशयात खुबे,मासे, शेवाळ, कृमी,किटक आदि पक्षांचे आवडते खाद्य विपुल प्रमाणात उपलब्ध होत असल्याने विविध जातींचे लाखोंच्या संख्येने स्थलांतरीत पक्षी या परिसरात मोठ्या प्रमाणात येतात.

दरवर्षी पावसाळा संपताच हिवाळयाच्या सुरुवातीपासूनच परदेशी पक्षांच्या स्थलांतराचा काळ सुरु होतो.हवामान, अन्नाची उपलब्धता, प्रजनन, खराब हवामानापासुन बचाव व सुरक्षित वातावरणासाठी भारतात सुमारे 370 प्रजातींचे पक्षी स्थलांतर करतात. हे स्थलांतरित पक्षी सुर्य,तारे, पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राचा आधार घेऊन दिशा ओळखतात.या स्थलांतराच्या काळावधीत उरण परिसरातील पाणथळी, जलाशये आणि खाडी किनाऱ्यावर सीगल,फ्लेमिंगो,नीलबदक, युरेशियन टील,नॉर्दर्न पिनटेल,इबिसेस,बारहेडेड गूज ,हंस, तुतवार, पेलिकन,क्रेन अवाक,कारंडव आदी पाणथळी तसेच व विविध शेकडो विविध जाती,प्रजातींचे स्थलांतरित पक्षी दरवर्षी हिवाळयात उरण परिसरात दाखल होतात.

मात्र सातत्याने हवामानात होणारे बदल आणि लांबलेला पाऊस यामुळे यंदाचे वर्ष



त्याला अपवाद ठरले आहे. यावर्षी जानेवारीला सुरूवात झाली आहे.मात्र उरण परिसरात लाखोंच्या संख्येने थव्याने येणारे स्थलांतरित पक्षी आलेले आढळून येत नाहीत. काही पाणथळी जागेत स्थलांतरित पक्षी अगदी नगण्य, तुरळक संख्येने आढळून येत आहेत. सीगल,फ्लेमिंगो,नीलबदक, युरेशियन टील,नॉर्दर्न पिनटेल,इबिसेस,बारहेडेड गूज ,हंस, तुतवार, पेलिकन,क्रेन, अवाक,कारंडव आदी स्थलांतरित पक्षी युरोप,ऑस्ट्रेलिया,सैबैरिया, मंगोलिया, पाकिस्तान,मध्य आशिया,दक्षिण आफ्रिकेतुन पाच-दहा हजार किलोमीटरचा प्रवास करुन येतात. उरण परिसरात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या स्थलांतरित पक्षी पाहणे पक्षी प्रेमींसाठी एक पर्वणीच असते.त्यामुळे स्थलांतरित दुर्मिळ पक्षांच्या हालचाली व छबी टिपण्यासाठी पक्षीप्रेमीं दरवर्षी या ठिकाणी येत असतात. मात्र पक्षी निरीक्षणासाठी येणाऱ्या पक्षी प्रेमींसाठी कोणतीही सोय अद्यापही उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.हे दुदैवी आहे.

बदलते वातावरण,खराब हवामान व पावसाळा लांबल्याने उरणमध्ये यंदा विविध स्थलांतरित पक्षांचे आगमन लांबणीवर पडले आहे.अशी प्रतिक्रिया उरण वनक्षेत्रपाल नथुराम कोकरे यांनी व्यक्त केली आहे.तर थंडीच्या दिवसातही धोकादायक वादळे, अतिवृष्टी व सातत्याने बदलत्या हवामानामुळे यंदा जानेवारी महिना उजाडला तरीही उरणमध्ये स्थलांतरित विविध पक्ष्यांचे दर्शन झाले नसल्याची प्रतिक्रिया वन्यजीव संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी यांनी व्यक्त केली आहे.

बदलते वातावरण,खराब हवामान व पावसाळा लांबल्याने उरणमध्ये यंदा विविध स्थलांतरित पक्षांचे आगमन लांबणीवर पडले आहे.अशी प्रतिक्रिया उरण वनक्षेत्रपाल नथुराम कोकरे यांनी व्यक्त केली आहे.तर थंडीच्या दिवसातही धोकादायक वादळे, अतिवृष्टी व सातत्याने बदलत्या हवामानामुळे यंदा जानेवारी महिना उजाडला तरीही उरणमध्ये स्थलांतरित विविध पक्ष्यांचे दर्शन झाले नसल्याची प्रतिक्रिया वन्यजीव संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी यांनी व्यक्त केली आहे.

## बागलाण तालुक्यात अवकाळी पावसाचे थैमान

**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी/दीपक गायकवाड :** काल झालेल्या पावसाने व गारपिटीने तालुक्यातील अनेक गाव विस्कळीत झाले यात शेतकऱ्यांच शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. नुकसान झालेल्या आहे पिकात कांदा, गहू अश्या पिकांचे नुकसान झाले असून लवकरच पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी स्थानिक शेतकरी करीत आहेत यात ढोलबारे,बोढरी,कोटबेल,



जायखेडा,वीरगाव,करंजड,नीताने या गावांमध्ये पाऊस व गारपीट झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून अस्मानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

## मेंडका येथील ६२ वर्षीय शेतकरी बेपत्ता; नातेवाईकांची माहिती देण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**मेंडका ता. मुदखेड, जि. नांदेड) :** मेंडका येथील श्री. बाबुराव दत्ता चुकेवाड (वय ६२ वर्षे) हे दि. ७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ५ वाजता शेताकडे जाण्यासाठी घरातून निघाले असून, अद्यापपर्यंत त्यांचा काहीही थांगपत्ता लागलेला नाही. या घटनेमुळे कुटुंबीयांसह परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

कुटुंबीय व नातेवाईकांनी आजूबाजूच्या परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला



असता देखील बाबुराव चुकेवाड यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही. त्यामुळे त्यांचा शोध घेण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, कोणाला श्री. बाबुराव दत्ता चुकेवाड आढळल्यास किंवा त्यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास त्वरित खालील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन कुटुंबीयांनी केले आहे.

संपर्क :

गंगाधर श्रीराम दासरे – ७०२०१३५१०३

बालाजी लक्ष्मण नागलवाड – ९९२२०१६२१८

तुळशीराम संभाजी चुकेवाड – ८३७९००१३६१

## पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिना निमित्त भव्य कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने दिनांक ६ जानेवारी रोजी दर्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी पत्रकारितेचे आद्य जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास पाटोदा तालुका पत्रकार संघाचे संस्थापक/अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, पत्रकार संघाचे सचिव ॲड.महेश बेदरे, कार्याध्यक्ष



अमीर शेख यांच्या सह पत्रकार सुधीर एकबोटे, विजय जाधव, राहुल सोनवणे, शेख महेशर, दत्ता वाघमारे, सचिन गायकवाड, अजीज शेख, रियाज सय्यद सह आदी पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दर्पण दिनाचे औचित्य साधून पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांच्या पुढाकारातून उपस्थित पत्रकार बांधवांना लेखणी साहित्याचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी बोलताना ॲड. महेश बेदरे यांनी दर्पण दिनाचे महत्त्व विशद केले. लोकाभिमुख आणि लोकहितवादी पत्रकारिता ही काळाची गरज असून समाजातील विविध समस्या, जनतेच्या अडचणींसह विकासात्मक व सकारात्मक बाबी ही माध्यमांद्वारे सातत्याने मांडल्या गेल्या पाहिजेत, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पाटोदा तालुका पत्रकार संघातील सर्व पत्रकार बांधवांनी सहकार्य केले.

## रासपा जि.प , व पं .स निवडणूक सर्व ताकदीनिशी लढणार - हाके

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती राष्ट्रीय समाज पक्ष सर्व ताकदीनिशी पाथरी मतदारसंघ व गंगाखेड मतदारसंघातील लढणार असल्याचे नुकत्याच झालेल्या बैठकीत जिल्हाध्यक्ष अशोक हाके यांनी सांगितले राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर प्रदेशाध्यक्ष काशीनाथ शेवते मुख्य महासचिव माऊली सलगर यांच्या आदेशाने दि ५ जानेवारी रोजी पाथरी मतदारसंघ व गंगाखेड. मतदारसंघातील सर्व जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक संदर्भात गंगाखेड येथे राष्ट्रीय समाज पक्षाच्या मुख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली या बैठकीत आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा करून पाथरी व गंगाखेड तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक सर्व ताकदीनिशी उतरणार असल्याचे ठरविण्यात आले जिल्हा परिषद पंचायत समिती लढविण्यासाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांनी जिल्हाअध्यक्ष अशोक हाके व माऊली ताटे गोविंद मानवतकर विलास गाडवे गंगाखेड तालुकाध्यक्ष एकनाथ मारोतराव गेंजगे सोनपेठ तालुका अध्यक्ष रामेश्वर आळसे राजेभाऊ हिंगे राम मरगळ जो जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक आहेत यांनी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे

## सारा तेंडुलकर यांच्या हस्ते लाईट स्टाईलचे उद्घाटन ; सारा ही देवकन्या आहे : महेंद्र घरत

**दैनिक युवक आधार/ महाराष्ट्र प्रतिनिधी :** माझी आजी बालपणी मला काही तरी लहानसे सोन्याचे घ्यायची, तिच्या मुळेच मला लेटेस्ट दागिन्यांची आवड निर्माण झाली. त्यामुळे नवीन जनरेशनचा विचार करून पीएजीने तयार केलेल्या लेटेस्ट दागिन्यांची भुरळ नक्कीच तरुणाईला पडेल, असे मत लाईटस्टाईलचे उद्घाटन करतान सारा तेंडुलकर यांनी खारघर येथे काढले. यावेळी त्यांच्या हस्ते दागिन्यांच्या शोरूमचे उद्घाटन झाले. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे उपस्थित होते.

यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी सचिन



तेंडुलकर यांनी क्रिकेटला वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. क्रिकेट विश्वात अजरामर राहील अशी कारकीर्द केली. सचिन तेंडुलकर हे क्रिकेटचे देव आहेत. त्यामुळे सारा तेंडुलकर ही देव कन्या आहे असे गौरउद्गार काढले.

दरम्यान महेंद्रशेठ घरत यांनी सारा तेंडुलकर यांच्याशी संवाद साधला. तेव्हा आपण नवीन वर्षाच्या शुभमुहूर्तावर आजोबा झाल्याचे महेंद्रशेठ घरत यांनी 'गुड न्यूज' सारा तेंडुलकर यांना दिली. त्यानंतर चक्क सारा तेंडुलकर यांनी महेंद्रशेठ घरत यांच्या नातीसाठी नाजूक आणि आकर्षक दागिना पसंत केला. तो महेंद्रशेठ घरत यांनी ताबडतोब खरेदी केला

यावेळी प्रीतम म्हात्रे यांनी सारा पनवेल नगरीत पहिल्यांदा आली आहे. पीएनजी ज्वेलर्स हा मराठी उद्योजकांचा ब्रॅण्ड आहे. आम्हाला यांचा सार्थ अभिमान आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने पीएनजीचे सौरभ गाडगीळ यांनी सारा तेंडुलकर, महेंद्र घरत, प्रीतम म्हात्रे यांचा यथोचित सन्मान केला.

## रासेयो शिबिरातून विद्यार्थी कर्तृत्व आणि नेतृत्वास झळाळी मिळते : पृथ्वीराज घोलप

**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय :** व्यक्तीने सामाजिक दायित्व स्वीकारले व समाजहित समोर ठेवून काम केले तर समाज आपोआपच माणसाला मोठे करतो ही भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे खरे काम राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून घडते. महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच व्यवहारी आणि सामाजिक ज्ञान मिळविणे हे विद्यार्थीदशेत अत्यंत महत्वाचे असून पुणे विद्यापीठ अंतर्गत राबविली जाणारी एन.एस.एस.ही योजना विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने स्वावलंबी बनविण्याचे महत्त्वाचे काम करते,त्याच बरोबर त्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि नेतृत्व गुण विकास करते,त्यामुळे रासेयो शिबिरातून खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला आणि नेतृत्वाला निश्चितच झळाळी प्राप्त होते असे प्रतिपादन श्री छत्रपती कारखान्याचे संचालक पृथ्वीराज घोलप यांनी केले. भवानीनगर येथील छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत बुधवार दिनांक 07 जानेवारी रोजी विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी संचालक पृथ्वीराज घोलप अध्यक्षीय मनोगतात बोलत होते.

यावेळी प्रास्ताविकातून प्राचार्या शिवाली माने देशमुख यांनी सात दिवशीय शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचा लेखाजोखा उपस्थित मान्यवरांसमोर मांडला. कार्यक्रम अधिकारी प्रा अस्मिता चांदगुडे यांनी शिबिर काळात केलेल्या सामाजिक



उपक्रमातील पाणलोट व पडीत जमीन व्यवस्थापन, आर्थिक सामाजिक सर्वेक्षण, पर्यावरण संवर्धन, मतदान जनजागृती, प्रभात फेरी व सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी विषयी माहिती दिली. रासेयो मधून विद्यार्थ्यांची होणारी वक्तृत्व, नेतृत्व व कर्तृत्वाची जडणघडण सांगून, विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाची प्रशंसा व कौतुक केले.यावेळी विध्यार्थीनी यांनी अहवाल वाचला,तर कु.आक्का यांनी शिबिरात केलेल्या कामांचे अनुभव मनोगतातून व्यक्त केले.

## साक्री शिर्डी महामार्गवर ढोलबारे येथे अपघातात अमलीपाडा येथील दाम्पत्य ठार

**दैनिक युवक आधार**

**बागलाण प्रतिनिधी/दीपक गायकवाड :** तालुक्यातील ढोलबारे येथे रास्ता अपघतात नवापूर तालुक्यातील पती-पत्नीचा अज्ञात वाहनाने धडक दिल्यामुळे मोटर सायकल वरील संदीप गावित वय वर्ष ३५ व पत्नी आशा गावित वयवर्ष ३१ याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली असून सटाणा पोलिस स्टेशनला अज्ञात वाहन धारकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, संदीप गावित व त्यांच्या पत्नी अशा गावीत हे आपल्या मुलाला भेटण्यासाठी येवला येथे निघाले असताना ढोलबारे येथे त्यांच्या दुचाकीला अपघात झाला या अपघातात दोघेही ठार झाले असून त्यांची दुचाकी क्रमांक (MH 39 F2840) व पती-पत्नीचा अज्ञात वाहनाच्या धडकेने मृत्यु झाला अपघात इतका भयानक होता की मयतांचे मृतदेह



हे अत्यंत हृदय द्रावक अवस्थेत विखुरलेले होते. सदरील घटनाही ढोलबारे ता.बागलाण येथे घडली त्याची माहिती मिळताच सटाणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक योगेश पाटील व शिपाई निंबा खैरनार, गणेश गरुड हे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व अपघात ग्रस्त झालेल्या दांपत्याला रुग्णवाहिकेने कोणताही उशीर न करता सटाणा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश गरुड, निंबा खैरनार हे करीत आहेत.

## मुदखेड मध्ये मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी/ प्रकाश गवारे :** मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ०६ जानेवारी १८३२ रोजी मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली. महाराष्ट्रात सर्वत्र दर्पण दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने मुदखेड शहरात मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या फलकास पुष्पहार अर्पण करून बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर मुदखेड नगर परिषदेच्या वतीने नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ विश्रांती पाटील कदम यांच्या वतीने पत्रकारांना लेखणी व डायरी पुष्प देऊन स्वागत करण्यात आले पत्रकाराने शहर विकासासाठी अनेक उपयोजना सुचवून सकारात्मक बातम्या देऊन सहकार्य करण्याचे आवाहन नूतन नगराध्यक्षा सौ. विश्रांती कदम यांनी केले. यानंतर माधव पाटील कदम यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती व दर्पण दिनानिमित्त पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार प्रल्हाद मस्के, नगरसेवक संजय आऊलवार,संदिप मोडवान यांनी आपले विचार मांडले. माजी नगरसेवक कैलास गोडसे, अभियंता सुमित गोडसे यांनी जनसंपर्क कार्यालयात समस्त पत्रकारांना दस्ती लेखणी पुष्प देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. तसेच मुदखेड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या वतीने डायरी लेखणी पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला. लोकमंगल मल्टिस्टेट बॅंकेच्या वतीने



सन्मान व सत्कार करण्यात आला.

मुदखेड पोलीस ठाण्याचे पो. नि. यानी पत्रकारांच्या लेखनीतून समाजाला दिशा देण्याचे काम केले जाते शासन प्रशासन सुरळीत चालण्यासाठी लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाचे महत्त्वपूर्ण काम असून पत्रकारांनी निर्भीडपणे कार्य करत राहावे पोलीस प्रशासन आपल्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या दर्पण दिनाच्या कार्यक्रमात पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, शेख अजगर हुसेन पाशाभाई, ईश्वर पिन्नलवार जिल्हा सहसचिव, संतोष पाटील गाढे, जयराम वन्ने, उत्तम हनुमंते,रुखमाजी शिंदे साहेबराव गागलवाड, नामदेव राहेरे, अतिक अहेमद, दिनेश शर्मा, साहेबराव हौसरे, धम्मदाता कांबळे, अब्दुल रझाक, संतोष सावंत, शेख इरफान, संतोष दर्शनवाड,शेख शमशुद्दीन, मनोज कमटे, देवानंद गुंजाळ, आशिष कल्याने अमोल टेकले, हाफिज खुरेशी, म.हाकिम, पिराजी गाडेकर,अजय कांबळे, यासह आदींची उपस्थिती होती. सर्व नियोजित कार्यक्रमात सुरेख सुत्रसंचालन पत्रकार संजय कोलते जिल्हा संघटक यांनी केले.

दर्पण दिनानिमित्त शहरात अनेक ठिकाणी पत्रकार संघाच्या सदस्यांना पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला.

## प्रियदर्शीनी इंग्लिश स्कूलचे कराटे स्पर्धेत घवघवीत यश








**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** जत जि.सांगली येथे युनिव्हर्सल शोतोकॉन कराटे-डो असोसिएशन ऑफ इंडिया आयोजित 4 कराटे चॅम्पियन 2026 या कराटे स्पर्धेमध्ये प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज इंदापूर स्कूलचे घवघवीत यश संपादन केले. व गोवा येथे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली कराटे स्पर्धेत शिवतेज अनभुले मीक्षा दिवशे प्रथम गोल्ड मेडल वरद दिवशे द्वितीय सिल्वर मेडल तसेच अथर्व दिवशे आशिया शेख प्रणिती आदलिंग ईश्वरी दिवशे परिशिष्ट धायगुडे तृतीय ब्रांझ मेडल वरील सर्व विद्यार्थ्यांनी स्कूलचे कमवले विध्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक श्री. सचिन केंगार सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेचे चेअरमन पी.जी.नायर सर व्हा.चेअरमन इम्रान शेख सर, प्राचार्य श्री.सुधिर भिसे सर उपप्राचार्य श्री बोधले सर,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले व पुढील क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## मराठा सेवा संघाचा "मराठा कृषी भूषण पुरस्कार" अमृत पॅटर्न चे जनक शिवश्री अमृतराव देशमुख यांना जाहीर

**दैनिक युवक आधार**

**मनोज उर्फ एम.डी. सुरोशे महागाव(यवतमाळ) :** मराठा सेवा संघ द्वारा आयोजित जिजाऊ सृष्टी मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे राजमाता, राष्ट्रमाता, स्वराज्य संकल्पिका जिजाऊ मासाहेब यांचा 428 वा जिजाऊ जन्मोत्सव 12 जानेवारी 2026 रोजी आयोजित केला आहे. जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त शिवधर्म पिठावर कापूस व इतर पिकांमध्ये विक्रमी उत्पादन घेणारे अमृत पॅटर्नचे जनक शिवश्री अमृतराव दादाराव देशमुख रा.आंबोडा यांना यावर्षीचा "मराठा कृषी भूषण पुरस्कार "जाहीर करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय शिवश्री पुरुषोत्तमजी खेडेकर साहेब, केंद्रीय मंत्री खासदार प्रतापरावजी जाधव व इतर मान्यवर तसेच लाखो जिजाऊ व शिवभक्त उपस्थित राहणार आहेत. अमृतराव देशमुख यांना मिळणारा हा मराठा कृषी भूषण पुरस्कार महागाव तालुका व यवतमाळ जिल्ह्यासाठी अभिमानाची



गौरवाची बाब आहे. त्यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याची पावती आहे. जिजाऊ जन्मोत्सवाचे व या पुरस्कार सोहळ्याचे आमंत्रण देण्यासाठी शिवश्री दिगंबरराव जगताप राज्य उपाध्यक्ष मराठा सेवा संघ, सुरेशराव कदम विभागीय अध्यक्ष, वसंतराव देशमुख केंद्रीय कार्यकारणी सदस्य, पी डी शिंदे जिल्हाध्यक्ष जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, श्रीकांत देशमुख जिल्हा उपाध्यक्ष, डॉ. संदीप शिंदे जिल्हा सचिव,अमोल जगताप जिल्हा सहसचिव,उदय भाऊ नरवाडे तालुकाध्यक्ष,पंकज देशमुख तालुका सचिव, सतीश ठाकरे तालुका कोषाध्यक्ष, प्रसिद्धीप्रमुख गजानन वाघमारे, नानाभाऊ ठाकरे,दत्तराव कदम सुनील भरवाडे,सतीश ठाकरे, दिनेश देशमुख व सर्व मराठा सेवा संघाचे पदाधिकारी यांनी अमृतराव देशमुख यांना मराठा सेवा संघाची दिनदर्शिका, निमंत्रण पत्रिका,पुष्पगुच्छ देऊन निमंत्रण दिले अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## इजळी येथील ज्येष्ठ नागरिक सोपानराव हाटकर यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वार्ताहर :** इजळी (ता. मुदखेड, जि. नांदेड) येथील ज्येष्ठ नागरिक सोपानराव पुरभाजीराव हाटकर यांचे वयाच्या ८० व्या वर्षी वृद्धापकाळाने दि. ०६ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर दि. ०७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ०३:३० वाजता इजळी येथील त्यांच्या राहत्या घरी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

सोपानराव हाटकर हे शांत, प्रेमळ व कुटुंबवत्सल स्वभावाचे व्यक्तिमत्त्व म्हणून




परिचित होते. त्यांच्या जाण्याने कुटुंबासह नातेवाईक व मित्रपरिवारात शोककळा पसरली आहे.त्यांच्या पश्चात दोन मुली तसेच राहुल, मिलिंद, प्रविण, अमर, कपिल व चंद्रकांत हाटकर असा मोठा परिवार आहे. सर्व कुटुंबीय एकत्र राहतात.

## पंचायत समिती वाशिमच्या भोंगळ कारभारामुळे जीरामजी योजनेतील मजुरांवर उपासमारीची वेळ - शुभम भाऊ मुसळे

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील :** पंचायत समिती वाशिमच्या भोंगळ व हलगर्जी कारभारामुळे जीरामजी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. विशेष म्हणजे सिंचन विहिरींचे मस्टर अचानक बंद करण्यात आल्याने मजुरांचे काम थांबले असून त्यांना रोजगार व मजुरी दोन्हीपासून वंचित राहावे लागत आहे.जीरामजी योजनेअंतर्गत सिंचन विहिरींची कामे सुरू असताना अनेक मजूर या कामावर अवलंबून होते . मात्र कोणतीही पूर्वसूचना न देता विहिरींचे मस्टर बंद केल्यामुळे मजुरांचे हातचे काम गेले आहे. यामुळे अनेक मजुरांच्या घरात चुल



पेटेना अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे .मजुरांनी प्रामाणिकपणे काम करूनही त्यांची थकीत मजुरी अद्याप अदा करण्यात आलेली नाही. त्यातच मस्टर बंद झाल्यामुळे नवीन कामही मिळत नसल्याने मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. मुलांचे शिक्षण, औषधोपचार व दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले असून काही मजुरांवर कर्ज काढण्याची वेळ आली आहे.

वारंवार पंचायत समिती व संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप मजुरांनी केला आहे. सिंचन विहिरींचे मस्टर तात्काळ सुरू करून थकीत मजुरी अदा करण्यात यावी, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा युवासेनेचे उपजिल्हा प्रमुख शुभम भाऊ मुसळे यांनी समाज माध्यमांशी बोलतांना म्हणाले आहे.मस्टर पडण्याकरिता दोनच महिने बाकी असून या प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालावे असे सुद्धा मुसळे यांनी समाज माध्यमांशी बोलतांना सांगितले आहे.

## पत्रकार दिनी कु. अवनी अर्जुन जाधवचा कला रत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले

**दैनिक युवक आधार**

**ठाणे / प्रतिनिधी :** सहा जानेवारी हा दिवस मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंतीनिमित्ताने पत्रकार दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.या दिवशी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आणि करण्यासाठी आपल्या हातांना बळ देऊ पाहणारया पत्रकार, साहित्यिक, कलावंत, खेळाडू यांच्या अनेक पत्रकार संघ, संस्था, संघटना, महापालिका आणि महाराष्ट्र सरकार पुरस्कार देऊन सन्मानित करत असते.ठाणे शहरातील ' ठाणे नवादूत ' या वृत्तपत्राच्या माध्यमातून संपादक दिनेश जोशी हे दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, कार्य करणाऱ्या कलागुणांचा सन्मान करत असतात. कु.अवनी अर्जुन जाधव हिला ' कला रत्न ' पुरस्कार देऊन पत्रकार दिनी मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे येथे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.कु. अवनी



अर्जुन जाधव हिने अनेक महापुरुषांची रेखाचित्र आपल्या प्रतिभा शक्तीच्या कलाकृतीतून रेखाटलेली आहे. तिच्या रेखाचित्राना पारितोषिके ही मिळालेली असून मुंबई येथील प्रसिद्ध जहांगिर आर्ट्स येथे भरलेल्या प्रदर्शनात मानाचा सहभाग ही मिळाला होता. चंदगड विधानसभा मतदारसंघाचे स्वर्गीय आ. आणि चंदगडी रत्न मा. नरसिंगराव गुरूनाथ पाटील यांचे प्रथम रेखाचित्र रेखाटून तिने कलाक्षेत्रात प्रवेश केला आहे.

## संघर्ष,सेवा आणि समर्पणाचा सन्मान :सौ. सुशीलाताई इंगळे यांना जीवनगौरव पुरस्कार...

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** तालुक्यातील गलवाडा गावातील समाजातील दुर्बल,गरजू व उपेक्षित घटकांसाठी सातत्याने कार्य करत सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या गलवाडा गावाच्या कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत सदस्या सौ. सुशीलाताई चंद्रकांत इंगळे यांना ए.डी.फाउंडेशन,महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने साहित्यरत्न जीवनगौरव पुरस्कार–२०२५ प्रदान करून सन्मानित करण्यात



आले.सौ.सुशीलाताई इंगळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण,महिला सक्षमीकरण,जनजागृती तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य केले आहे.त्यांचे कार्य हे केवळ पदापुरते मर्यादित न राहता समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचले आहे. सेवा हाच धर्म मानून त्यांनी केलेले योगदान प्रेरणादायी ठरत आहे.

सौ.सुशीलाताई इंगळे या लोकनेते आमदार अब्दुल सत्तार साहेबांच्या निष्ठावंत कार्यकर्त्या असून सर्व समाज घटकांना सोबत घेऊन काम करणारे समन्वयक व सकारात्मक नेतृत्व त्यांच्यात आहे.गावाच्या विकासासाठी त्यांनी घेतलेली पुढाकाराची भूमिका आज अनेकांसाठी आदर्श ठरत आहे. या मानाच्या पुरस्कारामुळे सोयगाव तालुक्यातील गलवाडा गावात मानाचा तुरा रोवला गेला असून,इंगळे कुटुंबीयांसह संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे.त्यांच्या या यशाबद्दल विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

समाजासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या अशा महान व्यक्तींना मिळणारा सन्मान हा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## भात खरेदीला गुरुवारपासून होणार सुरुवात; आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** शासकीय आधारभूत पनवेल भात खरेदी केंद्रावर गुरुवारपासून भात खरेदीला अधिकृतरित्या सुरुवात होणार असून, त्यामुळे परिसरातील भात उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. वेळेवर भात खरेदी सुरू व्हावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही प्रक्रिया सुरू होत असल्याने भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शेतकऱ्यांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर तसेच संबंधित शासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

दरवर्षी भात खरेदीला विलंब झाल्यास



शेतकऱ्यांचा भात घरातच साठवून ठेवावा लागतो. त्यामुळे आर्थिक अडचणी निर्माण होऊन शेतकऱ्यांना मोठ्या चिंतेला सामोरे जावे लागते. त्या संदर्भात शेतकऱ्यांनी आपली व्यथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे मांडली. ही परिस्थिती लक्षात घेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांनी तात्काळ भात खरेदी प्रक्रिया वेळेत सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी चर्चा करून आवश्यक त्या सूचना दिल्या. त्या अनुषंगाने सदरच्या गोदामातील माल खाली होण्यास सुरुवात केली असून उद्यापासून शेतकऱ्यांच्या भात खरेदीला सुरुवात करण्याचे जिल्हा पणन अधिकारी श्री. ताटे यांनी आश्वासित केले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारामुळे पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी भात खरेदीचा मार्ग मोकळा झाला असून, शेतकऱ्यांना हमीभावाने भात विक्री करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत होणार असून, शासनाच्या आधारभूत दर योजनेचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांना मिळणार आहे.

## सिल्लोडचा 'आदित्य मिरकर' देशात चमकला; अंतराळ विज्ञान ऑलिंपियाडमध्ये पटकावले रौप्य!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** भारतीय अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात भविष्यातील शास्त्रज्ञ म्हणून सिल्लोडच्या आदित्य निलेश मिरकर याने आपली ओळख अधोरेखित केली आहे. बेंगळुरू येथील प्रतिष्ठित 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' (IISc) च्या वतीने आयोजित "इंडियन स्पेस सायन्स ऑलिंपियाड २०२५" या राष्ट्रीय स्पर्धेत आदित्य मिरकरने सर्वभारतीय स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावून जिल्ह्याच्या आणि राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

बेंगळुरू येथील के. व्ही. रमण ऑडिटोरियममध्ये ही स्पर्धा अत्यंत चुरशीच्या वातावरणात पार पडली.




देशभरातून निवडक २१०० स्पर्धकांनी या ऑलिंपियाडमध्ये सहभाग नोंदविला होता. तीन दिवस चाललेल्या या उपक्रमात भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आणि देशातील प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कठीण परीक्षेत आणि प्रयोगांच्या फेरीत आदित्यने आपल्या प्रगल्भ वैज्ञानिक ज्ञानाच्या जोरावर देशात दुसरे स्थान मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

**'रॉकेट वुमन'च्या हस्ते गौरव**

आदित्य मिरकर याच्या या देदीप्यमान यशाची दखल घेत, इस्रोच्या ख्यातनाम शास्त्रज्ञ आणि 'मिशन मंगलयान'च्या डेप्युटी डायरेक्टर श्रीमती रितू करीढाल श्रीवास्तव यांच्या हस्ते त्याचा विशेष गौरव करण्यात आला. आदित्यला प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि अंतराळ निरीक्षणासाठी अत्यंत उपयुक्त असा 'टेलिस्कोप' प्रदान करण्यात आला. एका महान शास्त्रज्ञाच्या हस्ते मिळालेली ही शाबासकी आदित्यच्या भविष्यातील वैज्ञानिक प्रवासासाठी मोठी ऊर्जा ठरणारी आहे.

**यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड येथील इयत्ता बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेणाऱ्या आदित्यला या यशासाठी डॉ. निलेश मिरकर व डॉ. सुषमा मिरकर या पालकांचे भक्कम पाठबळ लाभले. तसेच राजश्री शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुल पालोदकर, प्राचार्य डॉ. अशोक पंडित, प्रा. डॉ. दत्ता काकडे, प्रा. संतोष लक्कस आणि प्रा. अंकुश जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.आदित्यच्या या यशाने सिल्लोड आणि परिसरातील शैक्षणिक व वैज्ञानिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने देशपातळीवर मारलेली ही मजल प्रेरणादायी ठरत आहे. त्याच्या या कामगिरीबद्दल त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## आकर्षक परताव्याचे अमीश दाखवून करोडो ने फसवले

### पाच जणांवर गुन्हे दाखल, आरोपी केन्द्र प्रमुख गिरीश दुधे अटक

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर/ दिग्रस प्रतिनिधी :** दिग्रस शहरातील शिक्षक, सहकारी व नातेवाईकांना गुंतवणीकवर पंधरा टक्क्याचे अमीश दाखवून तब्बल कोट्यवधी रुपयांची फसवणूक ग्रौ कॅपीटल कंपनीच्या सदस्यानी फसविल्याने पाच जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे दिग्रस तालुक्यातील ईसापुरचा केन्द्र प्रमुख गिरीश कीसन दुधे ,दिग्रस याला पोलिसांनी अटक केली आहे त्याचा सह अन्य चार आरोपी विरुद्ध दिग्रस पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार पुष्पांजली दीनेश रधेरीया ,मनोज अशोक पाटील,रा.वर्धा ग्रो कॅपीटल नावाच्या बोगस कंपनीची स्थापना केली या कंपनीत गुंतवणूक करण्यासाठी गिरीश दुधे बापु नगर याचा सह विनोद कीसन राव दुधे व



अर्पना विनोद दुधे तिघे राहणार दिग्रस यांनी शिक्षक कर्मचारी व परीचीताना गुंतवणूकीच अमिश दाखवले आर्कषक नफ्याच्या लालसे पोटी काही नी आजीवन जमा ठेवी गुर्तविल्या काहींनी कर्ज काढूनही कोट्यवधी ची रक्कम या योजनेत टाकली काही महीण्यापर्यत पंधरा टक्के परतावा व्यवस्थीत दील्या नंतर अचानक नोव्हेंबर पासून परतावा मिळणे बंद झाला आणि आरोपी दुधे हे कुटुंबासह पसार झाला त्यामुळे गुंतवणूकदार मध्ये खळबळ उडाली अखेर काही पीडीतांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली दिग्रस पोलिसांनी 6 जानेवारी ला पाचजणा विरुद्ध गुन्हा दाखल करुन गिरीश दुधे याला अटक केली आहे. या घोटाळ्यात जवळपास 30 कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याची चर्चा असुन अजून अनेक गुंतवणूक गुंतवणूकदार पुढे येत असल्याने तक्रारारीची संख्या व फसवणूकीचा आकडा वाढण्याची शक्यता आहे या प्रकरणी फसवणूक झालेल्या शिक्षक व कर्मचार्याच्या तक्रारीवरुन दिग्रस पोलिसांनी पाच आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करुन पुढील तपास सुरू केला आहे

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर ; एकशे तेरावा दीक्षांत समारंभ

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/ नागपूर विभाग :** दिनांक - ७ जानेवारी २०२६. वेळ : दुपारी ४ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११३ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता ऑडिटोरियम हॉल, नॅशनल फायर सर्विस कॉलेज राजनगर, नागपूर येथे संपन्न होत आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाच्या मा. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर ह्या भूषवतील, समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था नागपूरचे माननीय अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे उपस्थित राहणार आहे. याशिवाय या समारंभाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सन्माननीय सदस्य तसेच सर्व विद्याशाखांचे सन्माननीय अधिष्ठाता उपस्थित राहणार आहेत.

**पदवी / पदविकाधारक**

विद्यापीठाच्या स्थापनेला १०२ वर्षे पूर्ण झाले असून या दरम्यान अनेक शैक्षणिक संशोधन तसेच सामाजिक क्षेत्रात मोठी उपलब्धी प्राप्त केली याचे आपण साक्षीदार आहात. विद्यापीठाची संलग्नित महाविद्यालये आणि पदव्युत्तर शैक्षणिक विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य सातत्याने होत आहे. मोठ्या प्रमाणात परीक्षा घेण्याचे कार्य विद्यापीठ करीत असून यात सर्वांचा सहभाग महत्त्वाचा असतो. हिवाळी २०२४ व उन्हाळी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी / पदविका प्रदान केली जाणार आहे. दीक्षांत समारंभात प्रमुख अतिथी अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था नागपूरचे माननीय अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे यांच्या शुभहस्ते पदके/ पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना पुरस्कृत केले जाणार आहे.

या दीक्षांत समारंभामध्ये एकूण ६१,८७१ विद्यार्थ्यांना पदवी / पदविका प्रदान करण्यात येणार आहे. यामध्ये स्नातक पदवीधर ४९,२३० विद्यार्थी तर स्नातकोत्तर पदवीधर १२,०८७, डि.लीट २ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संलग्नित महाविद्यालयांतील पात्र पदवीकांक्षींची ( डिग्री सर्टिफिकेट) विद्याशाखा निहाय संख्या : विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - २०,३०८, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा - १४,६२५, मानव विज्ञान विद्याशाखा -१२,४४१, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा -५,७०९, स्वायत्त महाविद्यालये - ८,५१४, पदविका प्रमाणपत्र - २७३, एम.आर्च. बाय रिसर्च १. दीक्षांत समारंभात २ विद्यार्थ्यांना डि.लीट. पदविने सन्मानित केले जाणार आहे.




**पदके / पारितोषिके. :**

या दीक्षांत समारंभात परीक्षेमध्ये स्पृहणीय यश संपादन केल्याबाबत १४० प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना १९४ सुवर्ण, ८ रजत व २७ रोख पारितोषिक असे एकूण २२९ पुरस्कार वितरित केले जाणार आहे. हिवाळी २०२४ व उन्हाळी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय (मुख्य शाखा) नागपूर येथील क्रतिका शंकर धोटे या विद्यार्थिनींने बी.ए. एलएलबी (पाच वर्षीय अभ्यासक्रम) परीक्षेत सर्वाधिक एकत्रित वर्ग गुण सरासरी प्राप्त करून ५ सूवर्ण पदके व २ पारितोषिक प्राप्त केले. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थान नागपूर येथील विद्यार्थी सुचेतन प्रकाश गमने यांनी एम.बी.ए. परीक्षेत सर्वात अधिक एकत्रित वर्ग गुण सरासरी प्राप्त करून ६ सूवर्ण पदके, विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग (स्वायत्त) नागपूर येथील विद्यार्थिनी अर्चना किसन लाळे यांनी एम.ए. (बुद्धिस्ट स्टडीज) परीक्षेत सर्वात अधिक एकत्रित वर्ग गुण सरासरी प्राप्त करून ६ सूवर्ण पदके प्राप्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथील विद्यार्थी तथागत ठाकूर यांनी एल.एल.बी. (तीन वर्षीय अभ्यासक्रम) परीक्षेत सर्वात अधिक एकत्रित गुण सरासरी प्राप्त करून ५ सुवर्णपदके प्राप्त केले. यशवंत महाविद्यालय वर्धा येथील विद्यार्थिनी निवेदिता राजेंद्र फुसाटे यांनी एम.ए. (मराठी) परीक्षेत सर्वात अधिक एकत्रित वर्ग गुण सरासरी प्राप्त करून ४ सुवर्णपदके व १ पारितोषिक तसेच विद्यापीठाचे जनसंवाद विभागातील विद्यार्थिनी प्राची वामनराव ठाकरे यांनी बॅचलर ऑफ जर्नालिझम परीक्षेत सर्वात अधिक एकत्रित वर्ग गुण सरासरी प्राप्त करून ३ सुवर्णपदके व २ पारितोषिक प्राप्त केले.

**आचार्य पदवीधारक**

विद्यापीठाअंतर्गत शिक्षक व संशोधक विद्यार्थी संशोधनाचे कार्य करतात. या दीक्षांत समारंभात विद्या शाखा निहाय २७९ संशोधकांना आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात येत आहे. आचार्य पदवीधारकांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत १२१, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत ५८, मानवविज्ञान विद्याशाखेत ८१, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेत १९ आदींचा समावेश आहे.

**दीक्षांत समारंभाचे संकेतस्थळावर लाईव्ह प्रक्षेपण**

एकशे तेराव्या दीक्षांत समारंभाचे विद्यापीठ युट्यूब चॅनेल वरून दुपारी ३ वाजेपासून ते कार्यक्रम संपेपर्यंत थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. यामुळे विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ लाईव्ह बघण्याची सुविधा जगभरातील सर्व संबंधित विद्यार्थ्यांना व पालकांना उपलब्ध होईल.

पदके/ पारितोषिके प्राप्त सर्व विद्यार्थ्यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. दीक्षांत समारंभाला उपस्थित राहण्याकरिता विद्यार्थ्यांनी ८ जानेवारीला प्रवेशपत्र परीक्षा विभागातून प्राप्त करून घ्यावयाची आहेत.

आपण सर्व सन्माननीय पत्रकार बंधु-भगिनी आजच्या पत्रकार परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित झालात त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करते. विद्यापीठाच्या विविध उपक्रमांना आपण सातत्याने व्यापक प्रसिद्धी दिली आहे. विद्यापीठाची प्रतिमा उंचाविण्यासाठी आपणा सर्वांचे महत्त्वपूर्ण सहकार्य अपेक्षित आहे. दीक्षांत समारंभाला आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे यासाठी मी विद्यापीठातर्फे आपणास आमंत्रित करीत आहे.धन्यवाद.पत्रकार परिषदेला माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रभारी संचालक श्री मनीष झोडपे उपस्थित होते.

## आई फाउंडेशनच्या पाठपुराव्याने ओएनजीसीकडून दिव्यांगांना निओमोशन गाड्या वाटप

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड :** उरण (जि. रायगड) ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी), युनिट उरण यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात येणाऱ्या सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) उपक्रमांतर्गत उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.आई फाउंडेशन, उरण यांच्या सहकार्याने दहा दिव्यांग व्यक्तींना निओमोशन गाड्यांचे वाटप करून त्यांना स्वावलंबी जीवनाकडे वाटचाल करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.



मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी उरण येथील जी.ई.आर.एस. इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कूल, विमला तलाव परिसर येथे आयोजित कार्यक्रमात हा उपक्रम राबविण्यात आला. झोमॅटो फूड डिलिव्हरीसारख्या आधुनिक रोजगाराच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना उदरनिर्वाहाची संधी मिळावी, या उद्देशाने निओमोशन गाड्यांचे वितरण करण्यात आले.या उपक्रमामुळे दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने, आत्मविश्वासाने व स्वबळावर जीवन जगण्यास हातभार लागणार असून, समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी ही गाडी एक प्रभावी साधन ठरणार आहे. दिव्यांगांकडे सहानुभूतीच्या नव्हे तर क्षमतेच्या नजरेने पाहण्याची समाजात सकारात्मक भावना निर्माण होईल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. ओएनजीसीसारख्या सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेने सामाजिक जबाबदारीचे भान ठेवत दिव्यांगांच्या रोजगाराभिमुख सक्षमीकरणासाठी राबविलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, इतर संस्थांनीही अशा उपक्रमांत पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून प्रजासत्ताक महिला लोकसेवा चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे यंदाही पत्रकार मित्र असोसिएशन, आपला आधार फाउंडेशन, श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्टतर्फे महिला लोकसेवा चषक क्रिकेट स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेतील लकी ड्रा विजेत्यांना स्कुटी, सोन्याची नथ, कुलर, चांदीचे नाणे, इस्त्री, पैठणी यासह विविध आकर्षक बक्षिसे लकी ड्रा दिली जाणार आहेत. शनिवार दिनांक २४ जानेवारीला सकाळी दहा पासून स्पर्धेला सुरवात होईल. आकर्षक व दर्जेदार बक्षीसांची लयलूट या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला करता येणार आहे. दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत महिलांचे गट सहभागी होतात. बक्षीसांची लयलूट करताना त्याही नविन मैत्रीणींसोबत आणि अनुभवासोबत बरेच काही या स्पर्धेतून घेउन जातात. या स्पर्धेत विजेत्यांबरोबरच




सहभागी प्रत्येक महिलेला भेटवस्तू दिली जाईल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १४ जानेवारीपर्यंत नावनोंदणीची मुदत आहे. इच्छूकांनी नावनोंदणीसाठी आयोजक केवल दिपक महाडीक यांच्याशी ९३२०६४६५५५, ९३२११५८०९०, ९३२२२८२२२७ या क्रमांकावर संपर्क साधावा. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य. (अटी व शर्ती लागू ) स्पर्धेचे नियम व अटीमध्ये बदल करण्याचे अधिकार आयोजकांकडे असतील. या स्पर्धेत लोकसेवक महिला संघाना प्राधान्य दिले जाईल. प्रथम, द्वितीय व तृतीय संघाच्या सर्व विजेत्या महिलांना पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे पैठणी देण्यात येणार असल्याचे पत्रकार मित्र असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष केवल महाडिक व कार्याध्यक्ष नितीन जोशी यांनी सांगितले तर बक्षिसांमध्ये व नियमांमध्ये आयत्यावेळी बदल करण्याचे अधिकार सर्वस्वी आयोजकांकडे असतील याची कृपया नोंद घ्यावी.

## म्हसळ्यात शिक्षक संघाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

### शिक्षक संघटनेसाठी दोंदे कुटुंबियांचे मोलाचे योगदान - श्री किशोर मोहिते

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा | प्रतिनिधी प्रा. शिरीष समेळ :** अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ शाखा म्हसळा यांच्या वतीने अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचा वर्धापन दिन मंगळवार, दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी कन्या शाळा, म्हसळा येथे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे संयुक्त चिटणीस श्री. किशोर मोहिते यांनी भूषविले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अखिल रायगड प्राथमिक शिक्षक संघाचे माजी सरचिटणीस श्री. सुनील उमरोटकर, श्री. अनंत येलवे, तालुकाध्यक्ष सौ. सुमित्रा खेडेकर तसेच शिक्षण विस्तार अधिकारी श्री. बशीर उल्डे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले , सरस्वती माता दादासाहेब दोंदे, भाईसाहेब दोंदे, सुलभाताई दोंदे, यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन



करण्यात आले.कार्यक्रमात शाहीर श्री. सूर्यतळ व श्री. दिलीप शिंदे यांनी आपल्या सुरेल व पहाडी आवाजात स्वागतगीत व संघटनेवर आधारित गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर श्रीमती किर्तीमाला विचारे यांनी संघटनेची स्थापना, इतिहास व आजवर केलेल्या कार्याची माहिती दिली. आज शिक्षक जे विविध हक्क व सवलती उपभोगत आहेत, ती संघटनेच्या संघर्षाचे फळ असल्याचे त्यांनी नमूद केले.तालुकाध्यक्ष सौ. सुमित्रा खेडेकर यांनी आपल्या भाषणात संघटनेतील एकीचे महत्त्व अधोरेखित करताना, वाढत्या प्रशासकीय व मोबाईलवरील कामांमुळे शिक्षक बेजार होत असल्याचे सांगितले. संघटनेमुळेच स्वतःला विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाल्याचे नमूद करून सर्वांनी एकत्र राहून संघटनेची ताकद वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले.

अखिल रायगड प्राथमिक शिक्षक संघाचे माजी सरचिटणीस श्री. सुनील उमरोटकर व श्री. अनंत येलवे यांनी आपल्या भाषणात संघटनेच्या वाटचालीचा आढावा घेत म्हसळा तालुक्याने जिल्हा व राज्य पातळीवर नेतृत्व देत संघटनेला भक्कम पाठबळ दिल्याचे सांगितले. तालुक्यात एकच संघटना असल्याने निर्माण झालेल्या एकजुटीची ताकद त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केली. तसेच श्री. किशोर मोहिते हे राज्यस्तरावर नेतृत्व करत असल्याबद्दल अभिमान व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. किशोर मोहिते यांनी संघटनेविषयी मार्गदर्शन करताना संघटना आज २५ राज्ये, ३ केंद्रशासित प्रदेशात आणि १६७ देशात संघटना कार्यरत असल्याची माहिती दिली. दोंदे कुटुंबियांचे संघटनेसाठीचे योगदान, जुनी पेन्शन योजना, TET परीक्षा आदी विषयांवर अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ व अखिल रायगड प्राथमिक शिक्षक संघाने केलेल्या कार्याचा आढावा त्यांनी घेतला. शासनाकडून शिक्षकांवर लादल्या जाणाऱ्या अशैक्षणिक कामांमुळे शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत असल्याची खंत व्यक्त करत, शिक्षकांच्या न्यायहक्कासाठी संघटनात्मक एकजूट गरजेची असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शिक्षक बदलीमुळे रिक्त झालेल्या पदांवर सरचिटणीस – श्री. विश्वास काणेकर, संयुक्त चिटणीस निलेश शेळके, उपाध्यक्ष श्रीकांत गोरे, सल्लागार सुनील साठे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. कार्यक्रमासाठी कार्याध्यक्ष सौ. संगिता आंबेडकर, स्मिता शिंदे, जयसिंग बेटकर, सोनाबाई शिंदे, रवी नागरे, योगिता पारधी, निलेश पाटील, कैलास नागरगोजे यांच्यासह अनेक शिक्षक उपस्थित होते. संघटनेचे नवनिर्वाचित सरचिटणीस श्री. विश्वास काणेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

सूत्रसंचालन आदर्श व आयडॉल शिक्षक श्री. शशिकांत भिंगारदेवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंदिरा चौधरी, मिलिंद मुंढे, जयश्री गायकवाड, गावीत, दीपक लोतडा व पाडेकर यांनी सहकार्य केले.

## येवलवाडी येथील दानपेटी चोरणारे चोर सापडणार कधी?

### ग्रामस्थांसहनाथ भक्त रस्ता रोको करणार

**दैनिक युवक आधार**

**शिरुर कासार (प्रतिनिधी) :** तालुक्यातील येवलवाडी येथील जालिंदरनाथ मंदिरांमधू दानपेटी चोरीला जाऊन एक महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी त्याचा तपास आणखी चालूच आहे. चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद होऊन सुद्धा चोरट्यांना अटक झालेली नाही त्यामुळे नाथ भक्तामध्ये तीव्र नाराजी असून या घटनेचा शोध घेणे महत्त्वाचे आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की रायमोह जवळील येवलवाडी येथे जालिंदरनाथांची संजीवन समाधी आहे. या गर्भगिरीच्या रांगेमध्ये मच्छिंद्रनाथ , गहिनीनाथ , जालिंदरनाथ, कानिफनाथ असल्याने जालिंदरनाथाच्या चरणी लीन होण्यासाठी महाराष्ट्रासह देशभरातून नाथ भक्त मोठ्या संख्येने येतात.या ठिकाणी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. जालिंदरनाथाचे हे जाज्वल्य व पवित्र ठिकाण असल्याने वर्षभर मोठ्या प्रमाणावर भाविक या ठिकाणी येतात. वर्षभरामध्ये दोन वेळा यात्रा भरते. वार्षिक सप्ताहाचे आयोजन होते. महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार या सप्ताहामध्ये हजेरी लावतात .नारायण गड व गहिनीनाथ गड या दोन्ही रस्त्याच्या मधोमध असलेले जालिंदरनाथाचे ठिकाण आहे.

या मोठ्या असलेल्या या तीर्थक्षेत्र जालिंदरनाथ मंदिरामध्ये दत्त जयंतीच्या आदल्या दिवशी दि. ३ डिसेंबर रोजी बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास दोन तीन चोरट्यांनी मंदिरामध्ये असणारी दानपेटी उचलून घेऊन जात असताना दिसले. दानपेटी काही अंतरावर सापडली. त्यातील रक्कम घेऊन चोरट्यांनी पलाईन केले. या घटनेविषयी पाटोदा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद करण्यात आला असून तपास मात्र अजुनही चालूच आहे. नाथ भक्तामध्ये या घटनेमुळे नाराजी पसरलेली आहे. या घटनेविषयी तीव्र स्वरूपामध्ये नाथ भक्त आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. नवनाथांपैकी एकनाथ हे येवलवाडी या ठिकाणी असलेले जालिंदरनाथ हे नाथपंथीयांचे श्रद्धास्थान आहे. या

मंदिर २४ तास सीसीटीव्हीच्या निगराणी खाली आहे तरीसुद्धा हे धाडसी चोरी झाली. एक महिना होऊन गेला तरीही चोरटे पकडलेले नाहित . पोलीस खात्याकडून तपास सुरू आहे अशी माहिती तपासी अधिकारी एपीआय तागड साहेब यांनी दिलेली आहे. या तपासाची चक्रे वेगाने फिरवीत अशी अपेक्षा सर्व नाथ भक्तामध्ये आहे लवकरात लवकर या घटनेचा तपास वेगानेकरावा अशी नाथ भक्त अपेक्षा व्यक्त करत आहेत. अन्यथा रायमोह येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे नाथ भक्तांनी म्हटले आहे.

मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १२१ ■ गुरुवार, ०८ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

